## प्रकरण दुसरे

### "द.मा. मिरासदारांच्या कथांचे आशय आणि त्यातील विनोदाचे स्वरूप"

### "माझ्या बापाची पेंड" व "गप्पागोष्टी" या दोन कथासंग्रहांच्या अनुषंगाने

# प्रकरण दुसरे

## "द.मा. मिरासदारांच्या कथांचे आशय आणि त्यातील विनोदाचे स्वरूप" "माझ्या बापाची पेंड" व "गप्पागोष्टी" या दोन कथासंग्रहांच्या अनुषंगाने

### प्रास्ताविक :

पहिल्या प्रकरणात आपण विनोदाचे स्वरूप, प्रकार आणि मराठी विनोदी कथेची परंपरा यांचा संक्षिप्त मागोवा घेतला. या प्रकरणात आपल्याला द.मा. मिरासदारांच्या "माझ्या बापाची पेंड" व "गप्पागोष्टी" या दोन कथासंग्रहातील कथांचे आशय आणि त्यातील विनोदाचे स्वरूप पाहावयाचे आहे.

माडगूळकरांच्या "माणदेशी माणसा"पासून नवी ग्रामीण कथा जन्माला आली. त्यानी दाखवून दिलेल्या दिशेने अनेक नविन लेखकांनी आपली पावले टाकली व ग्रामीण कथेचा विकास केला. शंकरराव खरात, शंकर पाटील द.मा. मिरासदार, उध्दव शेळके, मनोहर तल्हार, बाजीराव पाटील,चंद्रकान्त भालेराव, रा.रं. बोराडे, आनंद यादव असे अनेक ग्रामीण कथालेखक या काळात उदयास आले. माडगूळकरांच्या माणदेशी माणसांबरोबर कोकण, खानदेश, व-हाड, मराठवाडा या प्रदेशातील ग्रामीण माणूसही कथेतून आपले अनुभव बोलू लागला. आपल्या बरोबर त्याने आपापली बोली आणली, तिचा आगळा रंगढंग आणला व आपापल्या प्रदेशातील मातीत वाढलेले जीवन प्रकट केले.

मराठी ग्रामीण कथेच्या क्षेत्रात गावरान विनोदाचा प्रवाह आणून सोडण्याची ~~मह~~ त्याची कामगिरी द.मा. मिरासदार यांनी केली आहे. व्यंकटेश माडगूळकरांचा आदर्श समोर ठेवून आपल्या गावाकडच्या माणसांच्या रंगतदार गोष्टी तितक्याच गावरान ढंगदारपणाने त्यांनी सांगितल्या आणि विनोदी कथेच्या क्षेत्रात आपले स्वतंत्र असे स्थान त्यांनी निर्माण केले.

"माझ्या बापाची पेंड" आणि "गप्पागोष्टी" या दोन्ही कथासंग्रहातील कथांची आशयसुत्रे लक्षात घेता, या दोन्ही कथासंग्रहातील कथांच्या विषयाच्या व जीवनचित्रणाच्या अनुषंगाने स्थूल वर्गीकरण अभ्यासाच्यादृष्टीने उपयुक्त ठरणार आहे. कथेत ज्या विषयांना व जीवनचित्रणाला प्राधान्य दिलेले आहे, त्याचा विचार करून हे वर्गीकरण करता येते. हे वर्गीकरण कथांच्या अभ्यासास व आकलनास उपयोगी ठरते. त्यादृष्टीने दोन्ही कथासंग्रहातील कथांचे स्थूल वर्गीकरण पुढीलप्रमाणे करता येते.

१) शालेय वातावरणाशी निगडित प्रसंगनिष्ठ कथा :

माझ्या बापाची पेंड, व्यंकूची शिकवणी, खेड्यातील एक दिवस, वर्गातील एक पाठ, ड्रॉईंग मास्तरांचा तास.

२) कौटुंबिक प्रसंगनिष्ठ कथा :

भावकी, मुले पळविण्याचा प्रकार.

३) गंभीर प्रसंगनिष्ठ कथा :

रानमाणूस, काकांची गंभीर गोष्ट.

४) ऐतिहासिक वातावरणाच्या कथा :

कोणे एके काळी.

५) व्यक्तिचित्रणप्रधान कथा :

सोन्या बामण, नव्याण्णवबादची एक सफर, एक सदाशिवराव आणि त्यांची बायको, गणपत पाटील, निकाल.

६) प्रसंगनिष्ठ संमिश्र कथा :

कळस, हरवल्याचा शोध, माझी पहिली चोरी, मदत, माझा के.वृत्तपत्रव्यवसाय, चुकामुक, झोप. या स्थूल वर्गीकरणाच्या आधारे "माझ्या बापाची पेंड" व "गप्पागोष्टी" या कथासंग्रहातील कथांच्या आशयसुत्रांचा विचार केला आहे.

१) शालेय वातावरणाशी निगडित प्रसंगनिष्ठ कथा :

मिरासदारांच्या कथेचा एक नजरेत भरणारा विशेष म्हणजे त्यांच्या शालेय वातावरणाशी निगडित असणाऱ्या प्रसंगनिष्ठ कथा होय. मिरासदार यांच्या कथाविश्वात शाळा-मुले-मास्तर यांना एक आगळे स्थान आहे. विद्यार्थी जीवनातील आणि शिक्षकी पेशातील अनेक बारकावे हेरून त्यातील संगती-विसंगती काहीशा मिस्कीलपणे त्यांनी मांडली आहे. शाळेच्या आवारातील मुले व मास्तर यांचे जीवन हा मिरासदारांच्या सतत कुतूहलाचा विषय बनलेला आहे. मिरासदारांनी काही काळ शिक्षक म्हणून काम केले. हे काम करताना आलेल्या अनुभवातून या कथा स्फुरलेल्या आहेत, आणि त्यांना वास्तव जीवनानुभूतीचा प्रत्ययकारी स्पर्श लाभलेला आहे.

"माझ्या बापाची पेंड", "व्यंकूची शिकवणी", "खेड्यातील एक दिवस" "वर्गातील एक पाठ", "ड्रॉईंग मास्तरांचा तास" या सुंदर कथा शाळा आणि शालेय जीवनाशी संबध्द आहेत. या कथांचे निवेदन त्यांनी लहान मुलांच्या मुखाने केले आहे. त्यामुळे त्यातील निरागस विनोद आणखीनच आकर्षक झाला आहे. यासंबंधी प्रा. वा.ल. कुलकर्णी लिहितात,-"हे बाल निवेदक दिसायला अत्यंत निरागस वृत्तीचे परंतु प्रत्यक्षात तितकेच मिस्कील व बेरकी आहेत. मिरासदारांच्या कथेत येणारी सर्वच मुले मोठ्यांच्या मुर्खपणावर, त्यांच्या ढोंगीपणावर, दंभावर, आत्मप्रीतीवर अगदी सहजपणे जेवढा खोचक प्रकाश टाकतात तेवढा ही मोठी माणसे देखील खुद्द स्वत:वर टाकू शकत नाहीत. मिरासदारांची या लहान मुलांवर तेवढ्यासाठीच भारी भिस्त आहे. लहान मुलांच्या दृष्टिकोणातून प्रौढांच्या व्यंगावर आणि दौर्बल्यावर नेमके प्रकाशझोत टाकणारी ही कथाचित्रे एकाच वेळी बाल व प्रौढ या उभयतांच्या संबंधाची जी एक खेळकर व प्रसन्न बाजू प्रकट करितात, तिला तर मराठी साहित्यात तोड नाही." [१]

अ) माझ्या बापाची पेंड :

इरसाल पोराच्या अवखळपणातून निर्माण होणाऱ्या प्रसंगाचे चित्रण मिरासदारांनी "माझ्या बापाची पेंड" या कथेतून केलेले आहे. अशा कथेच्या निवेदनात प्रसंगनिर्मितीला फार महत्त्वाचे स्थान असते. मिरासदारांनी ठसकेबाज प्रसंगनिर्मिती केली आहे. मूळ पात्रांशी समरस होऊन आत्मनिवेदन पध्दतीने मिरासदार या कथेचे निवेदन करतात.

धायगुडे नामक खेड्यातील एक पोरगं आपल्या बापाच्या पेंडीची हकीगत सांगत आहे असा आत्मनिवेदनात्मक पवित्रा मिरासदार येथे घेतात. धायगुड्याने चोरून खाल्लेल्या बापाच्या पेंडीने (म्हणजे गांजाने) चमत्कार दाखविण्यास सुरवात केली. सुलटी माणसे उलटी दिसू लागली. धायगुडे शाळेत आल्यानंतरच्या प्रसंगाचे वर्णन लेखक करतो,- "मास्तर आज नेहमीप्रमाणे सरळ उभे नव्हते. उलटे झाले होते. म्हणजे डोके खाली आणि तंगड्या वर आणि तरीही त्यांच्या हातात सरळ धरलेली छडी होती. ते ती सारखी परजत होते. चेहरा मात्र नेहमीसारखाच रागीट दिसत होता.... ही आज मास्तरांनी काय गंमत केली ? आमचा मास्तर पुष्कळ साडेशिटलीचा होता. पण ही मजा त्याने आम्हाला कधी दाखवली नव्हती."[२]

नजर धुंद झाल्यामुळे धायगुड्याला मास्तर उलटे झाल्यासारखे दिसत होते. आणि त्याचे त्याला हसू येत होते. त्यामुळे मास्तर अधिकच चिडत होते. अखेर धायगुड्याने प्रश्न विचारलाच "पण मास्तर आज तुम्ही उलट्या तंगड्या करून कसे उभे राहिला ? या प्रश्नाची जी भयानक प्रतिक्रिया झाली, तो प्रसंग कथेच्या आशयानुसार विलक्षण विनोदपूर्ण रितीने मिरासदारांनी वर्णन केला आहे.

धायगुड्याच्या खिशातली पेंड खाल्यावर मास्तरांवर झालेला त्याचा परिणाम, मुलांना गणित सोडवायला दिलेले असता, "झाला कारे इतिहास

लिहून ?" असे मास्तरांनी विचारणे, त्यावेळी "इतिहास तर इतिहास बरेच झाले. मला तर पाटीच नीट दिसत नव्हती, आणि आकडे मांडून मी ते खिशात हुडकत बसलो होतो" असे धायगुड्याने म्हणने, शिवाजीने कुणाला ठार मारले, जिजाबाईला की अफजुलखानाला याबद्दल निर्माण झालेला प्रश्न, मास्तरांनी खुशीत येऊन, एक हात कानावर आणि दुसऱ्या हाताने टेबलावर ठेका धरीत "काठेवाडी घोड्यावरती पुढ्यात घ्या हो मला" असले गाणे भर वर्गात म्हणणे आणि अखेर हेडमास्तरांच्या गळ्यात हात टाकून "अस काय करता ? घ्या ना हो पुढ्यात, येणार ना गडे ?" असे म्हणणे, आणि मास्तर खाली निपचित पडल्यावर "मास्तर मेले काय ?" असा प्रश्न धायगुड्याने नम्रपणे (?) विचारणे, या सर्वच घटनांमधून निर्माण होणारा विनोद कुठे प्रसंगनिष्ठ तर कुठे व्यक्तिनिष्ठही बनतो. कुठे तो विसंगतीमधुनही निर्माण झालेला आढळतो. मास्तरांचा लगदा आत ढकलल्यानंतर तोंडातून फेस येतो. त्यावेळी निवेदक म्हणतो - मला संशय आला, "कुत्र्याला गोळी घातली म्हणजे मरताना ते असेच फेसगाळीत असते." अशा खेडेगावातल्या रोजच्या निरीक्षणातल्या उपमा देऊनही विनोद साधला आहे.

कथेच्या शेवटी, आपला "बा" पोलीसांनी धरुन नेला हे समजल्यावर निवेदक धायगुडे म्हणतो — "ते ऐकुन मला कांही विशेष वाटले नाही.आमचा बा खंबीर होता. त्याची काळजी नव्हती.— पण भिती एवढीच वाटली की मास्तरांच्या खिशातून पडलेले तुकडे हेडमास्तरांना आवडले तर काय घ्या ?" यातील चमत्कृती आणि अतिशयोक्ती वाचकाला हास्याचा जोरदार फटका दिल्याशिवाय राहत नाही. कथेच्या आशयसुत्रानुसार मिरासदार अत्यंत विनोदी अशी प्रसंगनिर्मिती करीत करीत कथेचा शेवट करतात.

आ) <u>व्यंकूची शिकवणी</u> :

ग्रामीण जीवनातल्या विसंगती टिपणारे मिरासदार या कथेत

प्राह वयास मिळतात. शिक्षणामुळे संस्कारित झालेले त्यांचे मन व्यंकूसारख्या इरसाल पोराच्या मनाने ग्रामीण जीवनातल्या विसंगती जेव्हा पाहते तेव्हा ते जीवन त्यांच्या विनोदाचा विषय बनते. निरागस वृत्तीचा आणि बालबोध वळणाचा शिक्षक जेव्हा व्यंकूसारख्या इरसालाच्या झपाट्यात सापडून त्याच्या नादी लागतो तेव्हा, मिरासदारांच्या विनोदात उपहास आणि उपरोध यांचे सूर येऊन मिसळतात. बालबोध संस्कारातला मास्तर व्यंकूला शिकवता शिकवता त्याच्याकडून "बरेच काही" शिकतो आणि अखेर वाहवत जाऊन त्याच्यावरच कशी कुरघोडी करतो हे या कथेचे आशयसूत्र मिरासदार ढंगदारपणे कथन करतात.

शिकवणीला येणारे यदू वडाराचे पोरगे किडकिडीत आणि बारा-चौदा वर्षाचे असेल असे मास्तरला वाटले. पण अठरा-एकोणीस वर्षांचा, काळाकुट्ट, आडव्या अंगाचा, नकट्या नाकाचा, जाड कातडीचा आणि भरपूर मिशांचा हा बाप्या पाहिल्यावर वरकरणी काही दाखविले नसले तरी मास्तर मनातून हबकलाच होता. एक दिवस शिकवणी चालू असता मास्तर व्यंकूला काही प्रश्न विचारतात पण तो बोलत नाही. मास्तर आवाज चढवतात तेव्हा "जमलेलं" पान त्याला थुंकावच लागत. "खाऊ नये तंबाखू लेका, वाईट असतं" असा मास्तरने उपदेश केल्यावर "काय वाईट हूतं मास्तर!" या व्यंकूच्या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर मास्तरला देता येत नाही. कारण त्यानं तंबाखूच काय पण पानही खाल्लेल नसते.

मास्तरचा हा "विक पाइंट"लक्षात येऊन व्यंकू तंबाखूपुराण सुरू करतो. साक्षात देवानीच तंबाखू खाण्याचा कसा हुकूम दिला आहे ते स्पष्ट करतो पहा -

"तंबाखू ही फार उत्तम वनस्पती आहे आणि ती माणसाने हमेशा तोंडात टाकावी, असा प्रत्यक्ष देवाचाच हुकूम आहे. विठोबाने कमरेवर हात ठेवून असे शुभवर्तमान जगाला सांगितले आहे की, ही वनस्पती कमरेएवढीच उंच

असते. ती किती खावी असा प्रश्न विचारल्यावर मात्र त्याने गणपतीकडे बोट दाखविले. गणपतीने डावा हात पसरून उजव्या हाताने दोन बोटांची चिमूट सदैव धरलेली आहे. ती कशासाठी ? या वनस्पतीचे पान हातभर रुंदीचे असते आणि माणसाने ती चिमूटभरच तोंडात टाकावी हेच सांगण्यासाठी आणि नाही खाल्ली तर प्रत्यक्ष मास्तरायाचा कोप होतो. न खाणाऱ्या माणसाच्या मुस्काटात लगावण्यासाठी त्याने एक हात जो उगारलेला आहे तो अद्यापि तसाच आहे."[3]

तंबाखूचे पुराण ऐकल्यानंतर मास्तरवर त्याचा जो परिणाम होतो तो प्रसंगही मिरासदार उपरोधाने व्यक्त करतात.

मास्तरने व्यंकुपासून दुसरा धडा घेतला तो तमाशा पाहण्याचा "तमाशा फार वाईट असतो. चांगल्या माणसाने कधी बघू नये !" या उपदेशाला, "का बरं बगू ने ! काय वाईट असतं त्यात !" असा प्रतिप्रश्न जेव्हा व्यंकू विचारतो, तेव्हा मास्तराची दातखिळी बसते. त्याला उत्तर देता येत नाही.

तमाशा हा प्रकार चावट असल्याने लोक तिकडे बिलकुल फिरकत नसतील हा आपला समज उलटा असल्याचा मास्तरला प्रत्यय येतो; आणि त्यावरून कुठलीही गोष्ट स्वतः पाहिल्याशिवाय तिच्यासंबंधी बोलू नये अशा निष्कर्षाला तो येऊन पोहोचतो. इतकी माणसे बेधडक तिथे जात असतील ती काय गाढव म्हणून ! आणि इतके झाल्यावर आता मी नाही म्हणायचे हे बरे नव्हते. अशाने त्याला (व्यंकूला) फार वाईट वाटले असते. म्हणून मास्तर तमाशाला जातो आणि "भले मास्तर! अशी हुरेसरी पायजे. धापैकी धा मार्क तुमाला अशी व्यंकूसारख्या गुरूची (!) शाबासकी मिळवितो. तमाशातल्या गंमतीदार गोष्टी, तरुण बायकांचे नखरेदार बोलणे, सोंगाड्याचे मजेदार चावट बोलणे आणि चमत्कारिक अभिनय, या सर्व गोष्टींनी आपल्याला कशा गुदगुल्या होत होत्या हे

मास्तरने सांगणे, व्यंकूशी तमाशाच्या विषयावर गंभीर चर्चा करणे आणि त्यातल्या न समजणाऱ्या गोष्टी समजून घेण्यासाठी पुन्हा तमाशाला हजेरी देणे भाग पडणे आणि तमाशाला जाऊन मास्तराने उत्तरोत्तर " "ज्ञानी पुरुष" बनत जाणे. या सर्वच निवेदनात उपरोधाच्या कितीतरी छटा भरलेल्या आहेत.

व्यंकूने ठेवलेली बाई त्याला शोधण्यासाठी मास्तरांच्या खोलीवर येते तेव्हा "शिकवणी"तल्या मास्तरच्या तिसऱ्या धड्याला सुरवात झालेली असते. आपल्या विद्यार्थ्याने बाई (रखेली) ठेवावी आणि आपल्याला त्याची दखलही असू नये याची मास्तरला खंत वाटते. मग तो व्यंकूकडून हळूहळू या गोष्टी जमवायचे "तोडगे" शिकतो. "मास्तर, हे अवघड शास्त्र हाय पन तुमी कच खायचं काम न्हायी, तुमी टैट राहा. तुमालाबी जमलं. केल म्हंजे होतं।" असा व्यंकूकडून गुरुपदेश त्यांना मिळतो. व्यंकूकडून तो शीळ घालायला शिकतो. "गुरुचरित्र", "शनिमहात्म्य" सारखी पुस्तके अडगळीत टाकून "तोता मैना", "गुलबकावली" वाचू लागतो आणि एकदम "सुधारून" जातो.

मामा आजारी असल्याने व्यंकूला बाहेरगावी बरेच दिवस राहावे लागते. गावाहून आल्यानंतर व्यंकू मास्तरांच्या खोलीवर आला. त्याच्या हातात पाटी दप्तर नव्हते व चेहरा सुकलेला होता. तो मास्तरांना ठेवलेल्या बाईची हकीगत सांगतो. तिने व्यंकूला घराबाहेर काढलेले असते. मग व्यंकूने विचारलं, "पण मास्तर, तिन आस कशापायी केलं आसंल ?" तेव्हा अभिमानाने छाती फुगवून ताठ मानेने मास्तर म्हणाला, "ती हल्ली माझ्याकडे असते।"

अशारीतीने उपरोधाच्या अनेक छटांनी "व्यंकूची शिकवणी" पुरेपूर भरलेली आहे. ग्रामीण जीवनात कधी कधी कोण कुणाला कसे "शिकवितो" याचे विनोदपूर्ण दर्शन मिरासदार या कथेत घडवतात. मिरासदारांनी ही

कथा बहिर्मुख वृत्तीने लिहिलेली असली तरी तिच्यातल्या उपरोधपूर्ण विनोदाने वाचक जसा हसतो तसा काहीसा अंतर्मुखही होतो.

इ) खेड्यातील एक दिवस :

शिक्षकांनी सांगितलेल्या "खेड्यातील एक दिवस" या विषयावर निबंध कसा लिहावयाचा हा एका नागर जीवनातील शाळकरी मुलीच्या समोर प्रश्न उभा राहतो. शहरी जीवनात वाढलेली ही मुलगी तिला खेड्याविषयी काहीच माहिती नाही. खेड्याचे पाठातील वर्णन एवढेच त्या चिमुकल्या मुलीचे खेड्या-विषयीचे ज्ञान असते. परंतु ती ज्यावेळी आपल्या आई-वडिलांना खेड्याविषयी माहिती विचारते आणि आई-वडिल खेड्याविषयी जी माहिती पूरवितात त्या-वरून मिरासदार अनेक विनोदी प्रसंग तर निर्माण करतात त्याबरोबरच मोठयां-च्या अज्ञानावर मार्मिकपणे बोट ठेवत विनोदनिर्मिती साधतात.

कथेतील शाळकरी मुलगी आपल्या आई-वडिलांना"खेड्यातील एक दिवस" या निबंधासाठी खेड्याविषयी माहिती विचारते. मग वडिल रेल्वेतून पाहिलेले खेडेगाव, तेथील आंबराई, झुळझुळ वाहणारा झरा, इत्यादीचे वर्णन करतात व आई यु.के. मधील पाहिलेल्या खेड्याशी भारतीय खेड्याशी तुलना करून माहिती पुरविते. "सकाळी काय करतात हो खेड्यातील लोक ?" या बेबीच्या प्रश्नाला वडिलांनी दिलेले उत्तर पहा - "नक्की मला माहित नाही. पण मला वाटतं, ते सकाळी लवकर उठतात, अन् दूध आणायला बाहेर पडतात."

"हे तुम्हाला कसं माहित ?"

"ऑब्झर्व्हेशन मिस्टर ऑब्झर्व्हेशन. मी रेल्वेतून जाताना पुष्कळ वेळा पाहिले आहे. सकाळच्या वेळी लोकं हातात तांब्या घेऊन बाहेर चाललेले दिसतात."

"कुठं जातात ? डेअरीत पपा ?"

"डेअरीत ?" पपा गोंधळले, "मला वाटतं, आपल्या व्हिलेजमध्ये डेअरी नसते. पण असेल ही एखादा वेळेस. ते जाऊदे पॉईंट लक्षात घे. लोक सकाळी

तांबे घेऊन बाहेर पडतात. दुधासाठी समजलं ?" [४]

मग आईही माहिती पुरविते. सकाळपासून संध्याकाळपर्यंतच्या शेतक-याच्या कामाच्या वेळा, ब्रेकफास्ट इ. चर्चा होते. मध्येच आपल्या नव-याचा पगार कसा वाढत नाही हेही चर्चेत येते. शेतात पाऊस कधी पडतो या प्रश्नावर पपांची व ममीची वादावादी होणे, शेतात काय पिकते ? या प्रश्नावरचे पप्पांचे व मम्मीचे उत्तर, मम्मी आत गेल्यावर पप्पांनी आपले म्हणणे बरोबर असल्याचे बेबीला सांगणे आणि शेवटी "पिके यायला बी पेरावे लागते की काय ? अन् लागत असेल तर ते पुन्हा केव्हा ? पिकांच्या आधी की नंतर ?" हा बेबीचा प्रश्न वाचकांची करमणूक तर करतोच पण मोठयांच्या डोळ्यात अंजन घालतो.

एकूणाच या कथेतून-मुलीपेक्षा आपण "ज्ञानी" असल्याचा आई-वडिलांचा अहंकार आणि त्यातून मुलीला काय समजते या भूमिकेतून आपल्या कल्पनेने केलेले खेडयाचे वर्णन, मुलीचे कुतुहलजन्य मर्मभेदी प्रश्न आणि त्यावरची उत्तरे व वास्तव यांच्या मिश्रणातून साधलेला विनोद वाचकास एक वेगळाच आनंद देतो.

ई) <u>वर्गातील एक पाठ</u> :

भिकू मुंगळे हा एस्.टी.सी.च्या प्रशिक्षणात सराव पाठ घेत असताना जो प्रसंग घडतो त्याचे वर्णन मिरासदार वास्तवपूर्ण व रंगतदारपणे करतात. भिकू मुंगळे एस्.टी.सी.च्या वर्गात नाव दाखल करतो. तो मास्तर होण्याच्या उमेदीने मात्र प्रत्यक्ष वर्गावर सराव पाठ घेताना त्याची जी धांदल, गडबड, गोंधळ उडतो त्या प्रसंगाचे "वर्गातील एक पाठ" या कथेत मिरासदारांनी अतिशय विनोदपूर्ण असे चित्रण केले आहे.

इतर नोकरीपेक्षा मास्तरकीची नोकरी चांगली, पाचपन्नास मुलावर हक्क गाजविता येतो, सुट्टया भरपूर, इतर कटकटी कमी असे भिकू मुंगळ्याचे एकंदर मत असते. म्हणूनच तो मॅट्रिक झाल्यानंतर एस्.टी.सी.च्या वर्गात

BARR. BA... ...KAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

नाव दाखल करतो. सराव पाठावेळी भूगोल विषय शिकविण्याच्या दृष्टीने चांगला म्हणून तो"चहाचे उत्पन्न-आसाम प्रांत" हा घटक निवडतो आणि पूर्ण तयारीनिशी विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी वर्गात जातो. परंतु सराव पाठाची विद्यार्थ्यांना आधीच कल्पना असल्याने वर्गात मुलामध्ये दंगा-मस्ती सुरू होते. या प्रसंगाचे चित्रण मिरासदार अत्यंत रंगतदारपणे करतात.

भिकू मुंगळे वर्गात गेल्यानंतर मुलांना शांत करून घटकाच्या अनुरोधाने "सकाळी उठल्यावर तुम्ही काय करता ?"[5] हा प्रश्न विचारताच एका विद्यार्थ्याने दिलेले "परसाकडे जातो" हे उत्तर. यामुळे वर्गात गोंधळ माजतो. दुसऱ्या मुलाने आपण दूध पितो असे सांगितले तर तिसऱ्याने आई नसल्या-कारणाने आईचे नाव काढल्याबरोबर भोकांड पसरले. त्याला थांबवण्याचा प्रसंगही विनोदी आहे. सगळ्याच मुलांनी आपण सकाळी दूध पित असल्याचे सांगितल्याने "चहाचे उत्पन्न-आसाम प्रांत" या घटकाच्या प्रस्तावनेसाठी केलेला सगळा खटाटोप व्यर्थ गेला. मग मात्र वेळ न घालवता भिकू मुंगळ्याने नाईला-जास्तव मुलांच्याकडे लक्ष न देता चहा कोठे, कसा पिकतो व आसाम प्रांताची माहिती देण्यास सुरवात केली. पण मुलांनी माकडाचे प्रकरण मध्येच घुसड-ल्याने आपण काय शिकवित आहोत याचे भान न राहता तो बडबडत राहतो ते बडबडणे आणि घंटा झाल्यावर जिवावरच्या संकटातून मुक्त झाल्याप्रमाणे भिकू मुंगळ्याचे वर्गातून निघून जाणे
हे प्रसंग वास्तवाचे दर्शन घडवितात. दुसऱ्या दिवशी सराव पाठाचे टाचण मार्गदर्शक भिकू मुंगळ्याला देतात. त्यावेळी त्याला आपला पाठ कसा झाला असावा याची कल्पना येते.

ट्रेनिंग कॉलेजमधील पाठपध्दती, तिच्यातील तंत्रबध्दता, यांत्रिकता, कृत्रिमता, तिच्यावर आधारित शिकाऊ शिक्षकाची तयारी, सरावपाठांना सरावलेल्या विद्यार्थ्यांची शिक्षकाची फिरकी घेण्याची प्रवृत्ती यांच्या मनोज्ञ मिलनातून ही कथा साकार झाली आहे.

३) ड्रॉईंग मास्तरांचा तास :

निरागस, निष्पाप पण इरसाल पोरांच्या अवखळपणातून निर्माण होणाऱ्या प्रसंगाचे चित्रण मिरासदारांनी "ड्रॉईंग मास्तरांचा तास" या कथेतून केलेले आहे. मूळ पात्रांशी समरस होऊन आत्मनिवेदन पध्दतीने ठसकेबाजपणे मिरासदार निवेदन करतात. इतिहासाचे मास्तर रजेवर असल्यामुळे ड्राईंग मास्तर निवेदकाच्या वर्गावर जातात आणि मग ज्या गमती-जमती घडतात त्याचे खुमासदार वर्णन या कथेत येते.

तासाची घंटा झाल्यावर इतिहासाचे मास्तर न आल्यामुळे वर्गात चाललेला गोंधळ, निवेदकाची व वामन्या देशपांडे या मुलाची झोंबाझोंबी, वर्गभर निवेदकाला मिळालेला प्रतिसाद, अचानक ड्रॉईंग मास्तराचे वर्गात आगमन, "छान झालं सर, तुम्ही तासावर आलात. आता ड्रॉईंग घ्या सर, इतिहास नको अशी निवेदकाची सूचना, इतिहास घेण्याविषयी शिक्षकाचा हट्टाहास, परत "तुम्ही कसे घेणार इतिहास ?" हा निवेदकाचा प्रश्न, ड्रॉईंग मास्तरांचा प्रश्न व निवेदकाचे मनोगत इत्यादी प्रसंगामधून बालबुध्दीचे विद्यार्थी व अहंमन्य प्रवृत्तीच्या शिक्षकांच्या वर्मावर नेमके बोट ठेवण्याचे कार्य मिरासदार करतात.

"तुम्हाला येतो सर घ्यायला इतिहास ?" हा प्रश्न एका विद्यार्थ्याने विचारला अन् त्याच्या उत्तरादाखल मास्तरांचे निवेदन पाहण्यासारखे आहे. मग मात्र मास्तर खवळल्यासारखे दिसले. नाक फेंदारून ते ओरडले, "येतो का म्हणजे काय ? आम्ही कधी इतिहास वगैरे शिकलो नाही की काय पूर्वी ? खाड्खाड् पाठ म्हणून दाखवीत असू आहांत कुठं ? ... इतिहास तुमच्यापेक्षा आम्हाला अवघड होता बेटयांनो, तरी मुखोद्गत सगळं. शिवाजी महाराजांना औरंगजेबानं कसं हालहाल करून ठार मारलं, संभाजी आग्र्याहून कसा पळाला, अफझुलखानानं, शाईस्तेखानाचे कसे कान कापले,—सगळं अगदी

अगदी तोंडपाठ असायचं आम्हाला." [६]

मग ड्राईंग मास्तरांनी अभ्यासाची चौकशी करणे, पानिपतच्या तिस-या लढाईला तिसरीच लढाई हे नाव का पडले यावरचे निवेदन, पानिपतची पहिली व दुसरी लढाई कोणाकोणात व कशी झाली याचे मास्तरांनी केलेले वर्णन, शेवटी पानिपतच्या तिस-या लढाईबद्दल काहीच सांगता न आल्यामुळे झालेला गोंधळ पण तसे न भासवता मुलांना वाचनात गुंतवून ठेवण्याची मास्तरांची युक्ती,

त्या विद्यार्थ्यांच्या वाचनातील कुंजपुरा, विश्वासरावाचे वर्णन, निवेदकाचे वाचन, बारभाईचे कारस्थान, लढाईचा नकाशा, आणि तासाची घंटा या प्रसंगाचे चित्रण मिरासदारांनी रंगतदारपणे केले आहे. याबरोबरच "मग उद्या काय घेणार सर ?" या विद्यार्थ्यांच्या प्रश्नाला "तुमच्यापुढं काय टाळकं फोडायचं ? कांही म्हणजे कांहीच तयारी नाही लेको तुमची. छ्ट् ! ती भानगडच नको. आपली चित्रकलांच घेऊ तेच बरं" असे ड्राईंग मास्तरांचे उत्तर या सर्वांमधून सर्व विषयात आपण तज्ज्ञ आहोत असा टेंभा मिरवण्याची मास्तरांची इच्छा, त्या हव्यासातून प्रकट होणारे अज्ञान अहंमन्यप्रवृत्ती विद्यार्थ्यांना काय कळतं अशी समजूत आणि विद्यार्थ्यांची फिरक्या घेण्याची प्रवृत्ती, यावर मिरासदारांनी नेमके बोट ठेवून कथा रंजक बनविली आहे.

शालेय जीवनाशी निगडित असणा-या या कथांमधून शिक्षक, विद्यार्थी पालक या विविध घटकांतील वृत्ती-प्रवृत्तीमधील विसंगती मिरासदारांनी अचूकपणे टिपल्या आहेत. त्यात अतिशयोक्ती असली तरी तिला "संभाव्य"तेचा पाया प्राप्त झालेला आहे आणि म्हणून या कथा वास्तवाचा सत्याभासही देतात.

२) <u>कौटुंबिक प्रसंगनिष्ठ कथा</u> :

मिरासदारांच्या "भावकी", "मुले पळविण्याचा प्रकार" या प्रसंगप्रधान [७]

विनोदी कथातून प्रामुख्याने कौटुंबिक विश्वाचे दर्शन घडते. कुटुंबातील पति-पत्निचे प्रेम, लटके भांडण, भावकीतले वैर, कुटुंबातील दारिद्र्य, ओढाताण, दैनंदिन जीवन जगण्यासाठी चाललेली कुतरओढ या सर्वांचे चित्रण मिरासदार विनोदी शैलीने करतात. या कौटुंबिक कथा कुटुंबातील घटकांचे वरवरचे चित्रण करीत असल्या तरी हसवता हसवता वाचकाला अंतर्मुख होऊन विचार करायला लावतात.

अ) भावकी :

पारंपरिक वैराचे पीक मनात जपणारी खेड्यातील माणसे आणि मुलांच्या निरागस मनातही ते पीक कसे पेरले जातात, पारंपरिक वैराने धुमसणाऱ्या मनात फक्त ठिणगी पडण्याचा अवकाश की त्याचा भडका कसा उडतो याचे चित्रण मिरासदारांनी येथे सुक्ष्मपणे केले आहे. 'भावकी'च्या निमित्ताने मनुष्यस्वभावाचे दर्शन मिरासदारांना घडवायचे आहे.

खेड्यातल्या बामण आळीतल्या अगदी टोकाला बल्लाळांचा वाडा आहे. वाड्याच्या दाडी दरवाजा घोड्यावरची आसामी जाईल इतका उंच. पडायला झालेल्या त्या वाड्यातल्या जुनाट घरातून देशपांडे घराण्यातली सगळी कुटुंबे राहतात. वाड्यात समाईकपणे राहणाऱ्या या माणसांचे आणि त्यांच्या प्रवृत्तीचे चित्र मिरासदारांनी थोडक्यात पण परिणामकारक असे रेखाटले आहे. पहा —

"ही मंडळी मोठया दाराचा, परसदाराचा, नि अंगणाचा समाईक उपयोग करीत. तिथे स्वत:च्या मालकीचे खण सोडून बाकी सगळे समाईकात होते, हागंदारीसुध्दा. भांडाभांडी चाले. समाईक भिंतीवरुन पुरुष भांडत, ओसरीवरच्या समाईक उखळावरुन बायका कलागती करीत. ही भांडणे कित्येक दुयापासून चालत आली होती, आणि ती तशीच चालू होती. किंबहुना यासाठीच आपण जन्माला आलो आहोत, असे देशपांडे घराण्यातील कर्त्या पुरुषांना वाटत असे. या घरातला धूर त्या घरात गेला तरी ते निमित्त

भांडणाला पुरे. वर्दळ माजे. मग कोर्टात खटले-खोकले, दावे दोरखंडे चालत. शेताचे तुकडे विकून सरकारी अधिका-यांची धन होई. त्याचा निकाल लागाय-च्या आत नवी चारदोन भांडणे झालेली असत." [७]

अशा परिस्थितीत अण्णा देशपांडेच्या लहानग्या केशवाने आणि राघू देशपांडेच्या थोरल्या अनंताने एकत्र खेळणे, फिरणे अवघडच होते. दोन घरामधले वैर जाणत्या अनंताला माहित होते. तरीपण गो-या आणि अशक्त केशवबद्दल त्याला विनाकारण ओढ वाटे. त्याच्या ससासारख्या भिरभि-या डोळ्याकडे त्याला सारखे पहावेसे वाटे. म्हणून शाळा सुटल्यावर गर्दीत चेंगरुन घाबरा आणि रडवेला झालेला आणि रस्त्यातल्या चिखलात पाय घसरुन पडलेल्या केशवला पाहून अनंताला दया येते. रडकुंडीला आलेले ते भाबडे पोर पाहून तो पुढे धावतो. दोन्ही घरामधल्या वैराच्या आठवणीने तो क्षणभर घुटमळतो. पण पुन्हा पुढे होतो. ढोपराला लागल्यापेक्षा आपली कपडे गदळल्याची भीती केशवला जास्त वाटत होती. त्यावरुन घरी मार मिळाला असता. शेतातल्या दंडावर अनंता केशवचे कपडे धुवून देतो. झाडावर चढून त्याला चिंचबनातले चिगूर देतो. झाडावर त्याला झोके देतो. दोघेही चिंच-बनात खूप रमतात. नंतर दोघेही उशीर करुन दिवेलागणीनंतर घरी येतात. त्यावेळी अण्णा देशपांडे केशवला आपल्या वै-याच्या म्हणजे राघू देशपांडेच्या अनंतासोबत पाहतो व पिढीजात वैर उफाळून येते. वास्तविक अनंताने केशवला मदतच केलेली असते. पण बापाच्या धमकावणीने बावरलेले ते बालमन 'आधी अंतानच कळ काढली' असा कबुलीजबाब देते आणि त्यातून अण्णा देशपांडे व राघू देशपांडे यांचे भांडण सूरु होते.

अनंता केशवपेक्षा मोठा असला तरी त्याला प्रौढ माणसाइतकी समज नाही. आपण केशवला मदत केली असतानाही त्याने 'आधी अंतानच कळ काढली' असे बाबाला सांगावे आणि तेवढयावरुन आई-माई उध्दरुन अण्णा देशपांडयाने

आपल्या बापाचे बाहूटे घुसळावे आणि डोळे पांढरे करण्याइतपत मारावे, फरशीची चिपरंग लागून त्याच्या डोक्यातून रक्त यावे या सर्व गोष्टीची अनंतालाही चीड येणे स्वाभाविक आहे. म्हणून अण्णा देशपांड्याचा सूड तो धाकट्या केशववर काढतो आणि वडयाचे तेल वांग्यावर निघते. चिंचबनात नेऊन निरपराध केशवला झाडाला टांगून तो बेदम चोपतो. कारण नसतानाही वडिलधा-यांचे भांडण लहानांपर्यंत पोचते ते असे. त्याचीही एक परंपरा तयार होते, ती टिकविण्याची मनोवृत्ती तयार होते आणि पिढयान-पिढया घरे आणि माणसे एकमेकांना दुरावतात. पण याचे भान न राखता वैराचे सातत्य राखण्याची विचित्र अशी पिढीची वृत्ती खेड्यावच्या 'भावकी" त सापडते. तिचे अत्यंत प्रातिनिधीक आणि मार्मिक दर्शन मिरासदारांनी येथे घडविले आहे.

आ) <u>मुले पळविण्याचा प्रकार</u> :

"मुले पळविण्याचा प्रकार" ही कथा प्रसंगप्रधान आहे. दत्तू चष्मेवाला व त्याची बायको गंगी यांच्या भावविश्वाचे दर्शन त्यांच्या स्वभावधर्मानुसार या कथेत शेवटपर्यंत जाणवते.

दत्तू चष्मेवाला हा आपल्या दैनंदिन जीवनाला सामोरे जाताना भुरटया चो-या करतो. वाळत घातलेले कपडे, खरकटी भांडी, दुकानातील किरकोळ माल लांबवीत असे. त्याची बायको-गंगी ही हीनव-याला आपल्या परीने संसाराला हातभार लावीत होती. या चोरीतून काहीच प्राप्ती होत नाही, उलट धोका जास्त पत्करावा लागतो म्हणून दत्तू चष्मेवाला कुणा तरी धनिकाचे मूल पळविण्याचे ठरवितो. या प्रकारात धोका कमी व संपत्ती भरपूर मिळते असा त्याचा समज असतो.

मुल पळविण्याचे ठरविल्यानंतर तो आपल्याच गल्लीतील दुकानदार धनीचंद मारवाड्याच्या दहाबारा मुलापैकी एक मूल पळवून आणतो. मूल पळवून

आणल्यानंतर बायकोला व त्याला खूप आनंद होतो. आपण आता कुटुंबाचे दारिद्र्य नष्ट करू असे त्याना वाटते. आलेल्या पैशाची कशी विल्हेवाट लावायची याचे गणित नवराबायको मनापासून करतात. या वेळेच्या नवरा-बायकोच्या संवादातून कुटुंबातील आर्थिक ओढाताण, मागासलेपणा, अज्ञान याबरोबरच नवरा-बायकोचे एकमेकावरचे प्रेमही दिसून येते.

पैसे मिळावेत म्हणून दत्तू चष्मेवाला धनीचंद मारवाड्यास सुरवातीस प्रेमळ पण नंतर धमकीची पत्रे लिहितो. परंतु धनीचंद मारवाडी आपल्या जन्मदत्त-वृत्तीनुसार आपल्याकडे पाहतो. दत्तूच्या धमकीला तो दाद देत नाही. आणखी एखादा मुलगा हवा असेल तर घेऊन जा असे सांगतो. आपण केलेली योजना तडीस तर जातच नाही उलट आपल्याच अंगलट येते की काय अशी शंका नवरा-बायकोला येते. तो प्रसंग पहा - "सगळया पोरांच्या घोळक्यांत बाहेर खेळणा-या राजमलकडे बोट दाखवून गंगी ओरडली, "आतां लवकर घालवा ही पीडा भायेर, न्हाईतर उपाशी -हावं लागंलं आपल्याला, सांगून ठिवते."

गांगरलेला दत्तू म्हणाला,
"आयला, मारवाडी लई खट हाये.!"
"मग .! म्यां काय सांगटलं हुत पयल्यांदाच ?"
"लई पचीताप झाला हयो"
"काय तरी तोडा वांग लवकर. ह्या काटयानं समदं घर खाल्लं चार दिसांत. खातो ते खातोयू अन् वर पुन्हा समधाशीं भांडतुया मुडदा. काल रखमीला कसली खोक पाडली .! शिप्प्यांचा पाय मुरगळला."[८]

या भानगडीतून पुन्हा घोटाळा होऊ नये म्हणून दत्तू धनीचंद मारवाड्याचे मूल परत करतो व वकिलामार्फत नोटीस काढतो. नोटीसीचा खर्चही त्यालाच करावा लागतो.

या कथेची पत्रात्मक शैली आहे. पत्रात्मक शैली वापरत असताना दत्तू चष्मेवाल्याचा "णमस्कार" आणि धनीचंद मारवाड्याचा "जयगोपाळ" चांगलाच लक्षात राहतो. व्यवसायानुसार व जातिधर्मानुसार माणसाची शैली बदलते. त्याचा बेमालुमपणे मिरासदार वापर करतात. कथेतील एकंदर घटना, प्रसंग, पात्रांच्या विशिष्ट लकबी, स्वभाव या घटकांची कथा पुढे नेण्यास व यशस्वी करण्यास मदत झाली आहे.

झटपट श्रीमंत होण्याचा सोपा मार्ग शोधण्याची जी माणसाची एक विशिष्ट प्रवृत्ती समाजामध्ये आढळते त्याचे प्रतीक म्हणून ही कथा पहावयास मिळते. दत्तू चष्मेवाला व धनीचंद मारवाडी त्यांच्या त्यांच्या स्वभावानुसार वागल्यामुळे त्या व्यक्ती वाचकांच्या चांगल्याच लक्षात राहतात.

दारिद्र्यामुळे सामान्य इच्छाही पुर्ण होत नाहीत, आणि पैसे मिळण्याची शक्यता निर्माण झाल्यावर त्या इच्छांच्या परिपूर्तीची दिवास्वप्ने पाहणाऱ्या दत्तुचष्मेवाला आणि त्याच्या पत्नीची मानसिकता मिरासदारांनी मोठया सामर्थ्याने अभिव्यक्त केली आहे.

मिरासदारांच्या या कौटुंबिक प्रसंगप्रधान कथामधून कुटुंबातील विविध घटकांवर प्रकाश पडतो. पति-पत्निचे प्रेम, लटके भांडण, दारिद्र्य, ओढाताण या सर्व घटकांतून मिरासदार कथा रंजक बनवितात व वाचकाला हसवता-हसवता विचार करायला लावतात.

३) <u>गंभीर प्रसंगनिष्ठ कथा</u> :

"रानमाणूस" व "काकांची गंभीर गोष्ट" या कथा गंभीर प्रसंगावर आधारलेल्या आहेत. "रानमाणूस" कथेतील बापूदेवाच्या मुलाचा मृत्यू आणि "काकांची गंभीर गोष्ट" या कथेतील काका गंभीर या गृहस्थाचा मृत्यू या शोकात्म घटना आहेत; परंतु हया घटनेभोवती जे प्रसंगचित्र उभे राहिले आहे ते मनुष्य-

स्वभावातील विविध विशेषांनी असे रंगलेले आहे की मूळ घटनेची दु:खद छाया केव्हा नाहिशी होते आणि त्याची जागा हास्यविनोदाने केव्हा घेतली तेच कळेनासे होते. या कथा मुनष्यस्वभावाशी संलग्न असलेल्या जीवनातील एका अर्थपूर्ण वास्तवावरच प्रकाश टाकण्याचे काम करतात. अशा प्रकारच्या त्यांच्या शोकात्म घटनेवरील कथा मोजक्याच असल्या तरी अव्वल दर्जाच्या आहेत.

त्यांच्या अशा शोकात्म कथेवर अभिप्राय नोंदविताना प्रा. वा. ल. कुलकर्णी, "मिरासदारी"च्या प्रस्तावनेत लिहितात,- "मिरासदारांच्या ह्या प्रकृतीने गंभीर व शोकात्म असणाऱ्या मोजक्या कथांमध्ये नेहमी हास्यजनक कथालेखन करणाऱ्या व म्हणूनच अतिशयोक्तीची सवय असलेल्या त्यांच्या लेखणीने अतिशयोक्ती टाळण्याचे केवढे तरी अवघड पथ्य पाळलेले आहे. ह्या सर्वच कथांमध्ये अर्थपूर्ण संयम आहे, नाजूक भावांची जपणूक आहे व त्याचे तितक्याच नाजूक पणे घडविलेले दर्शन आहे, अल्पाक्षरत्व आहे. म्हणूनच या बऱ्याचशा अबोल कथा अत्यंत बोलक्या झाल्या आहेत." [१]

मिरासदारांच्या या गंभीर कथांमधून त्यांच्या वेगळ्या लेखनवैशिष्ट्याचा प्रत्यय येतो. ते जीवनाकडे गंभीरपणे पाहतात. आणि अशा प्रसंगातील माणसांच्या मनोवृत्ती, त्यातील विसंगती, औपचारिकता यांचे भेदक दर्शन- मिरासदार घडवितात आणि त्यातून शोकात्मतेचा गाभा असलेला विनोद उभा राहतो.

अ) <u>रानमाणूस</u> :

"रानमाणूस" ही गंभीर प्रकृतीची कथा रेखाटण्यात मिरासदार यशस्वी झाले आहेत. पोटचे पोर जिवंत असताना आणि गेल्यानंतरही पैसा प्यार असणाऱ्या एका राक्षसी वृत्तीच्या माणसाचे चित्र मिरासदारांनी "रानमाणूस" मध्ये रेखाटले आहे. ब्राह्मणाच्या कुळात जन्माला येऊनही मुडदेफरासाप्रमाणे वागणारा, निर्घृणवृत्तीचा हा बापूदेव आहे. क्षोत्रोपाध्ये, यजमानकृत्य

करणारा बापूदेव हा निवेदकाचा मित्र कुशा याचा बाप. नुसते जगणे हीच बापूदेवाची महत्वकांक्षा. निवेदकाने बापूदेवाला लहानपणापासून पाहिले आहे. त्याला त्याच्यात काही फरक पडलेला दिसत नाही. कुणी रडले तरी त्याचा घसा कधी कळवळयाने दाटून आला नाही किंवा कुणी हसले तरी चेह--याचा कालीव चिरा कधी भंगला नाही. फारसा कधी तो बोलत नसे. जे थोडे शब्द बाहेर पडत ते शब्द नसून शब्दांचा चौथा असल्यासारखे वाटत.

बापूदेवाचा एकुलता एक मुलगा, कुशा क्षयाने आजारी असल्याचे निवेदकाला बापूच्या बोलण्यातून समजते. "मग काही औषधपाणी ?" या निवेदकाच्या प्रश्नाला बापूदेवाच उत्तर असे - "कशाचं औषध आणि कशाचं पाणी ? क्षयाच्या माणसाला त्याचा काही उपयोग आहे का ? तूच सांग. जीवघेणं दुखणं हे. झिजायचं झिजायचं आण एक दिवस खपायचं, मग उगीच खर्चाला कहार कशाला ?"[१०] बापूदेव असा पाषाण हृदयी होता.

कुशा दिवसेंदिवस झिजत होता, आणि सुरती समये हातात कुरवाळीत बापूदेव फक्त ते पाहत होता. कुशा जग सोडून गेला तेव्हा बापूदेव शेंगदाणे खाऊन डाराडूर झोपला होता त्याला उठवून आणाले तेव्हा -

"कुशा ! ..... कुशा ! गेलास ? ..... ब्ऽऽरं."

एवढे बोलून तो उठला आणि बाहेर येऊन पान खात बसला. मृत्यूसारखी भयाण घटना त्याच्या घरात घडूनदेखील साध्या दु:खाचा सुस्कारादेखील त्याने टाकला नाही.

कुशा गेल्यानंतर दोन-तीन दिवसांनी बापूदेव अंत्यविधीचे सामान देणा--या विक्रेत्याकडे जातो आणि सामानाचे बील मागतो. इतका तो पाषाणहृदयी आहे. निवेदकाने सांगितल्यावर दुकानदार बील देतो ते बिल वाचून बापूदेवने जे उद्‌गार काढले ते माणसाचे की पशुचे असा प्रश्न पडतो. बापूदेवाच्या चित्रणाद्वारे नराधमाचे रूप कसे असू शकते याचा प्रत्यय येतो. मानवी स्वरूपाचे

हे उग्रकठोर दर्शन मिरासदारांनी तितक्याच "उग्रपणे" घडविले आहे. "रान-माणूस" हे शीर्षकही अत्यंत समर्पक असे आहे.

आ) काकांची गंभीर गोष्ट :

काका गंभीर या गृहस्थाचे प्रेत ताब्यात घेऊन दहन करणे या घटनेवर मिरासदार या कथेची उभारणी करतात. कथेतील ही घटना शोकात्म आहे; परंतु ह्या घटनेभोवती मिरासदार जे प्रसंगचित्र उभे करतात त्यामुळे दु:खाची झालर कमी होऊन त्याची जागा हास्यविनोदाने घेतली आहे.

सरकारी हॉस्पिटलमध्ये काका गंभीर या गृहस्थाचे प्रेत ताब्यात घेण्यासाठी रामभाऊ,डोंगरे, विश्रामपंत इत्यादी चाळीतील मंडळी गेली. पण संध्याकाळच्या वेळी हॉस्पिटलचा डेड बॉडीज वॉर्डचा शिपाई न भेटणे, रामभाऊंचे खेकसणे, शिपाई आल्यानंतर त्याच्या बरोबरचा संवाद, काकांचा मृतदेह अपु-या माहितीनीशी ताब्यात घेणे, घरच्या मंडळींना दर्शन देऊन प्रेतस्मशानात आणणे, विधिसाठी तोंड मोकळे करताच आणलेले प्रेत काकांचे नसुन दुस-या कोणाचेतरी आहे हे समजणे, यावर भटजीचा सल्ला, परत हॉस्पिटल मधला प्रसंग आणि शेवटी डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार काकांचे प्रेत ताब्यात घेणे या सर्व घटनांमधून मानवी स्वभावाचे अनेक नमुने मिरासदारांनी वास्तवपूर्णतेने रेखाटले आहेत. कथेचा शेवटही चमत्कृतिपूर्ण असा आहे. पहा -

"अखेर सुर्यनारायणाच्या साक्षीने चिता पुन्हा रचली. अग्नि देण्यापूर्वी पुन्हा एकदा सगळ्यांनी नीट निरखून पाहिले. डोंग-यांनीही काकांना मिशा नाहीत याची खात्री करुन घेतली. चांगले न्याहाळून पाहिले. काका गंभीर गंभीरपणे पहूडले होते. आपल्या आयुष्यातील एकमेव विनोद प्रकाराचा त्यांच्या उघडया केलेल्या तोंडावर मागमूसहि नव्हता. डोळे मिटलेले होते. पण ओठांच्या कोप-यांवर मात्र कधी नव्हे ते बारीकसे स्मित उमटले होते ."[११]

प्रेतागारातून प्रेत ताब्यात घेऊन त्यावर अग्निसंस्कार करण्यासारख्या गंभीर प्रसंगात सहभागी झालेल्या माणसांच्या वृत्तीप्रवृत्तीवर मिरासदारांनी या कथेत अर्थपूर्ण प्रकाश टाकला आहे.

४) ऐतिहासिक वातावरणाच्या कथा :

"कोणे एके काळी" ही मिरासदारांची ऐतिहासिक वातावरणाची डूब असणारी कथा. आपली ग्रामीण कथेची रुळलेली वाट सोडून ऐतिहासिक काळातील एक प्रणय रम्य कथा मिरासदार येथे सांगतात. त्यांचा खरा ओढा हास्यकथेकडे असला तरी करुणगंभीर नाटयही त्यांनी क्वचित चित्रित केले आहे. संस्कृत काव्यातल्याप्रमाणे वातावरणाची निर्मिती, प्रेमीजनांच्या मिलनाचे संकेत, काव्यात्म भाषा, ऐतिहासिक वातावरणाला शोभेल अशी निवेदनाची शैली, त्यासाठी संस्कृतप्रचुर शब्दांचा केलेला वापर या सर्व वैशिष्टयामुळे ही कथा परिणामकारक झाली आहे. कथेतील नाजूक भावनांची जपणूक करण्यासाठी आपली नेहमीची शैली मिरासदार बदलतात. विषयापासून निवेदनापर्यंत पूर्ण-पणे वेगळ्या अशा कथेचे रूप येथे पहावयास मिळते. केवळ ज्याच्यामुळेच मोहि-नीने प्रसन्न व्हावे असे बुध्दिचातुर्य पोटासाठी विकाव्या लागणाऱ्या चतुर पुरुषाचे मिरासदारांनी रंगविलेले दु:ख मनाला चटका लावून जाते.

सोमशर्मा नामक एक चतुर, बुध्दिमान आणि प्रेमशास्त्रात जाणता असणारा तरुण महाराजांच्या पदरी विदुषक म्हणून राहतो. तो महाराजां-च्या कृपेवर जगतो. महाराज दुसऱ्या एका राज्यात पाहुणचारासाठी गेले असता, संध्याकाळच्यावेळी पुष्पवाटिकेत एका लावण्यवतीस पहातात व तिच्या मिलनासाठी झुरु लागतात. ती सुंदर तरुणी मिळवून देण्याची कामगिरी ते पदरी असलेल्या वक्रतुंडावर सोपवतात.

वक्रतुंड उर्फ सोमशर्मा याचे गमतीदार बोलणे, मोहिनी महाराजांना मिळावी म्हणून आपल्या बुध्दिकौशल्याने युक्त्या, प्रयुक्त्या करणे. शेवटी

मोहिनीची महाराजांना प्राप्ती करून देणे या निमित्त झालेल्या संवादातून निर्माण झालेला विनोद हसवत असला तरी त्यातील कारुण्य सहृदय वाचकाला उत्कटतेने जाणवत राहते.

या कथेला काव्यात्मकता प्राप्त झाली आहे. ती वेगळ्या कारणामुळे वरवर पाहता एका राजाला सुंदर स्त्रीबद्दल वाटणारे आकर्षण आणि त्याच्या चातुर्यावर (?) खूष होऊन तिने त्याचा केलेला स्वीकार अशा या ऐतिहासिक आणि कल्पनारम्य वातावरणाच्या कथेत लेखकाने निराशेचा, दुःखाचा सूर छेडलेला आहे. महाराज मोहिनीवर आसक्त झाले ते तिचे सौंदर्य पाहून. तिला प्राप्त करून घेण्याचे चातुर्य आणि बुध्दी त्यांच्याजवळ नाही. ती आहे वक्रतुंड उर्फ सोमशर्माजवळ. त्याच्या बुध्दिचातुर्यामुळे मोहिनी महाराजांवर प्रसन्न होते. हे चातुर्य महाराजांचेच असा तिचा अखेरपर्यंत समज राहतो. महाराजांच्या बुध्दिचातूर्याची ती वारंवार स्तुती करते. आणि महाराजांजवळ वैभव, संपत्ती आणि रूप नसते तरी त्यांच्या या बुध्दिवैभवाकडे पाहूनच आपण त्यांचा स्वीकार केला असता असे म्हणते. दुर्दैवाने हे बुध्दिवैभव महाराजांचे नसून ते उसने आहे हे तिला माहित नाही. संपत्ती, वैभव, रूप यापैकी काहीही नसलेले आपण आपल्या बुध्दिचातुर्यावर महाराजांना सुंदर स्त्री मिळवून दिली. ती ज्या बुध्दीवर भाळली ती बुध्दी आपली असुनही आपण ती प्रकट करू शकत नाही, हे त्याचे मोठे दुःख आहे. पण महाराजांनी आपल्याला आश्रय दिला या कृतज्ञतेपोटी तो दुःखाचे विष पिऊन टाकतो. मोहिनी समवेत बसलेले महाराज वक्रतुंडाला बोलावून, "तू होतास तरी कुठे इतका वेळ ?" असे विचारतात तेव्हा निलकंठाचे धैर्य अंगी आणून तो उत्तर देतो की, "मोठीच गंमत झाली. आत्ता चांदण्यात उभा असताना भूमीवर पडलेली माझी छायाच एकाएकी नाहीशी झाली. मी चावरून पाहिले तो एका चोराने माझे लक्ष नाही असे पाहून ती पळवली होती. तो पलायन करण्याच्या बेतात होता. पण मी त्याला गाठलेच. मग त्याच्याशी मल्लयुध्द करून माझी छाया मी सोडवून आणली. का, आहे

की नाही पराक्रम ?[१२] कवंडाच्या या उत्तरात जसे प्रसंगावधान दिसून येते तशीच सूचकताही प्रकट होते. कवंडाच्या उत्तराने महाराज, मोहिनी, दासी यांच्या हास्याचा खळखळाट झाला. त्या खळखळाटात डोळ्याच्या कोप-यातले पाणी कवंडाने कुणाच्या नकळत पुसून टाकले. इतरांना हस-विणा-या कवंडाच्या हास्याखाली केवढे तरी दुःख लपलेले होते. मानवी मनाच्या अंतरंगाचा वेध घेतल्याने ही कथा काव्यात्म बनली आहे.

५) व्यक्तिचित्रणप्रधान कथा :

मिरासदारांच्या काही कथात व्यक्तिचित्रणाला महत्व आहे. ग्रामीण जीवनातील नमुनेदार व्यक्ती शोधून त्यांच्या स्वभावातील आणि वृत्ती प्रवृत्तीतील विसंगतींचा आणि दोषांचा आविष्कार मिरासदार अशा पध्द-तीने करतात, की त्यातील विनोदाचा प्रत्यय वाचकाला सहजगत्या येतो. माण-सांच्यात आढळणा-या विसंगती वा वृत्तीप्रवृत्ती यांचा वेध घेताना त्याच्या कारणमीमांसेचाही ते मागोवा घेतात. आणि तो घेताना त्या माणसाच्या अंतरंगात ते प्रवेश करतात.

मिरासदारांच्या कथांतील व्यक्तिचित्रे वास्तव वाटतात. याचे कारण ती त्यांच्या जीवनाच्या मुशीतून आलेली आहेत. खेड्यातील व्यक्तिंचे बोलणे, चालणे, हावभाव, लकबी या सर्वांचे त्यांना जवळून निरिक्षण करता आले. तसेच आपल्यावरील माडगूळकर बंधूच्या लेखनांचा प्रभाव प्रांजळपणे नमूद करताना ते लिहितात- "माडगूळकरांचा आदर्श माझ्या डोळ्यासमोर होता. त्यांची व्यक्तिचित्रे मी वाचीत होतो आणि ही सगळी आपल्या जवळपास वावरणारी माणसे आहेत याचा मला प्रत्यय येत होता. त्यातूनच माझ्या लेखनाचा जन्म झाला. म्हणून माझे प्रारंभीचे लेखन व्यक्तिचित्रात्मक आहे, गंभीर आहे माझ्याही पोतडीत अशा चिजा भरपूर होत्या. म्हणून व्यक्तिचित्रे रेखाटणे मला फारसे कठीण गेले नाही. "रानमाणूस", "भोग", "सोन्या बामण"

UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

इत्यादी गोष्टी म्हणाजे व्यक्तिचित्रण तर आहेच, पण ते पूर्णपणे गंभीरही आहे. माडखूळकरांच्या लेखनाचा ठसा त्यात पूर्णपणे उमटलेला दिसतो." [१३]

"सोन्या बामणा", "नव्याण्णवबादची एक सफर", "एक सदाशिवराव आणि त्यांची बायको", "गणपत पाटील", "निकाल" या कथा व्यक्तिचित्रण प्रधान आहेत.

अ) सोन्या बामणा -

लांड्यालबाड्या, अफरातफर करणाऱ्या सोन्या बामणाच्या आत कुठे-तरी असलेला माणुसकीचा ओलावा त्याचे व्यक्तिचित्र रेखाटायला लेखकाला प्रवृत्त करतो. व्यक्तिप्रधान असणारी ही कथा वरवर विनोदी वाटत असली तरी तिची प्रकृती गंभीर अशी आहे.

केवळ ग्रामीण जीवनातच नव्हे, तर कुठेही भेटू शकेल अशा या सोन्या बामणाचे व्यक्तिमत्व मिरासदारांनी या कथेत चित्रित केले आहे. ब्राह्मण घराण्यात पण दारिद्र्यग्रस्त परिस्थितीत जन्माला आलेले हे पोरगे, धट्टीकट्टी प्रकृती आणि तितकेच धट्टेकट्टे मन यामुळे निर्लज्जपणे हसत ते जगायला शिकले. त्याचे नाव सोन्या देशपांडे, त्याचा बाप घटसर्पाने मेला होता. लेखकाची आणि त्याची दोस्ती झाल्यावर त्याने लेखकाच्या वडिलांना विचारून त्यांच्या-कडे आपल्या जेवणाचा वार लावून घेतला. त्यामुळे तर त्यांची दोस्ती आण-खीनच वाढली. पुस्तकातले ज्ञान सोन्याला फारसे नसले आणि त्यात त्याला रस नसला तरी बाहेरच्या जगातले त्याचे ज्ञान भरपूर होते. एकेक गोष्ट तो चार-चार पाच-पाच दिवस सांगत राही. तसा तो कल्पकही होता. हुशार माणसांना देखील न लागलेले शोध तो कधी-कधी जाहीर करी. एकदा तो म्हणाला, "असा एक शोध लागला आहे. आँ ! माणसाच्या पोटाला दार करायचे आणि आत पोटात एक पेटी ठेवायची !"

परिस्थितीने एक विचित्र असा निगरगट्टपणा सोन्याच्या स्वभावात आला होता. वाराने जेवून जगणाऱ्या सोन्याचा अभ्यासात आनंदच होता.

शाळेत जाऊन टिंगल-टवाळी करणे, खोटे बोलणे, एकादशी-द्वादशीला चंद्रभागेच्या वाळवंटात गोपी चंदनाचे नाम लावून पैसे उकळणे इत्यादी उद्योग तो करी. दारिद्र्याने जगण्याचा एक वेगळाच धोपट मार्ग सोन्याला दाखविला होता. प्रसंगी खोटे बोलून का होईना पण आपले काम उरकून घ्यावे हा जगण्यातला पहिला धडा तो फार लवकर शिकला आणि तेव्हापासून त्याच्या जीवनाला वेगळेच वळण लागले. तो घसरू लागला. लहान गुन्ह्याकडून मोठया गुन्ह्याकडे त्याचा प्रवास सुरू झाला. एक विचित्र निगरगट्टपणा सोन्याच्या ठिकाणी आला. लांडयालबाडया, अफरातफर, हकालपट्टी आणि पुन्हा नवी नोकरी असा त्याच्या आयुष्याचा आराखडा तयार झाला.

लेखक जो जो मोठा होत गेला तो तो त्याच्या आणि सोन्याच्या जीवनाचे धागे तुटत गेले. सोन्या लांबलचक गोष्टी सांगायचा तेव्हा लहानपणी आपल्याला तो फार मोठा वाटायचा; पण तो फार सामान्य होता हे आता लेखकाच्या लक्षात आले. त्याचे अलीकडेच उद्योग पाहून लेखकाला वाईट वाटे. सोन्या कुलकर्णी झाला त्यावेळी सातबाराचे उतारे देऊन पैसे काढणे, उता-यावर खोटी नावे लावणे, लोकांना पैशासाठी नाडणे, वांद झालेल्या माणसांना गोत्यात आणणे, तुरुंगात घालणे असल्या उद्योगात तो तरबेज होता. एकदा तर ज्यांनी खून केला त्यांचा तो खून सोन्याने पचवून दाखविला. तो जसजसा बिघडत चालला तसतसा लेखक त्याच्यापासून सावध राहू लागला. तरीपण बालपणी जुळलेल्या मैत्रीचे धागे कायमचे अलग झाले नाहीत. सोन्याबद्दल कुणी काही वेडेवाकडे बोलले की लेखकाला वाईट वाटे. पण सोन्या अगदीच काही वाईट नव्हता, हे लेखकाला येथे सांगायचे आहे. तो सामान्य होता, चारचौघात चालण्यासारखा होता, थोडीशी धस लागलेल्या कपड्यासारखा होता, तो वाईट आता झाला, पूर्वी नव्हता. त्याच्या या कोडगेपणात, निर्लज्जपणात, गुन्हेगारी वृत्तीतही माणूसकीचा ओलावा कुठेतरी लेखकाला दिसला होता. म्हणून

त्याची बालपणाची आठवण लेखक सांगतो. एका गरीब पोराला कागदाच्या गोळयात वाळू भरून लेखक मारायला धावतो तेव्हा सोन्या त्याला अडवतो आणि केविलवाणा चेहरा करून त्याला म्हणतो,

"नको रे, जाऊ दे त्याला. आईबाप नाहीत त्या पोराला. त्याला नको मारूस." बस्स! सोन्या एवढेच म्हणाला. अडखळत अडखळत म्हणाला आणि त्याच्या डोळयाला पाणीच आले.[१४]

सोन्याच्या निबर गुन्हेगारी व्यक्तिमत्वाच्या आत कुठेतरी माणूसकी-चा झरा लहानपणी वाहत होता. त्याची आठवण होऊन लेखकाच्या मना-तली सोन्याची प्रतिमा उजळ बनते.

आ) नव्याण्णवबादची एक सफर :

"नव्याण्णवबादची एक सफर" या कथेतील नाना चोडके हा एक कल्पक थापाड्या आहे. प्रत्यक्षात भेटलेल्या नानाला आपल्या प्रतिभेच्या डोहात बुडवून मिरासदारांनी कथेतला नाना निर्माण केला. सा-या गावची करमणूक करणारा नाना आत व्यथित आहे.
जीवनातल्या या अपूर्णतेचे दु:ख तो काल्पनिक गोष्टींनी आणि थापांनी भरून काढतो. लेखकाला त्याच्याबद्दल वाटणा-या सहानुभूतीमधूनच अशी व्यक्ति-चित्रे निर्माण होतात. नानाच्या थापांचे मानसशास्त्र बरोबर हेरून मिरासदा-रांनी ते तितक्याच रंजक पध्दतीने निवेदन केले आहे. विनोदाच्या शस्त्रानेही मानवी दु:खाचा वेध किती परिणामकारकपणे घेता येतो याचे उत्तम उदाहरण म्हणजे "नव्याण्णवबादची एक सफर" ही कथा होय.

पूर्वी माण नामे देशातल्या एका खेडेगावात नाना चोडके नावाचा अप्रतिम इसम राहात होता. हा इसम अगदीच बोंबलभिक्या असून दिसायलाही वेंगळ होता. कधी शिलाई काम, कधी बाजारात बसून तंबाखू विकणे असली

कामे तो करी आणि चार पैसे कनवटीला लावी. नाना घोडके परिस्थितीने गरीब आहे, ना घर ना दार. त्याला कोणत्या धंद्याचे कसब नव्हते. की अंगात ताकद नव्हती. पण नानाला देवाने विलक्षण कल्पना-शक्ती दिली होती आणि तिच्या प्रकटीकरणासाठी सहस्त्र वृत्तीचे बळ असलेली जीभ दिली होती.

नानाच्यागप्पांचे वैशिष्टय असे की त्यात खरा भाग फारच थोडा असे आणि बराचसा भाग अद्भुत आणि रोमहर्षक असे. अवाच्या सवा बोलण्याची नानाला फार हौस आणि लोकांनाही ते ऐकावेसे वाटे. बेताबेताने बोलावे, फारशा थापा मारु नयेत, पचेल तेवढेच थोडेसे इकडचे तिकडे करावे हे तत्त्व नानाला मान्य नव्हते. नानाच्या शंभर गोष्टी पैकी नव्याण्णव गोष्टी लोकांना आकलन होत नसत. आणि फक्त एक गोष्ट त्यांना खरी वाटे. म्हणून त्यांनी "नाना नव्याण्णवबाद" असे त्याचे इकास नाव ठेवले होते. अर्थात नानाला लोकांच्या मताशी कर्तव्य नसे.

नानाने आपल्याला वाघ आणि अमावास्येला समंध अथवा मुंजा भेटला असे सांगणे, एखाद्या खडट भूताचे दात पाडणे, आपल्याला बजरंगाची कृपा आहे असे सांगणे, लग्न न झाल्यामुळे आत ल्या आत कुढत राहणे अशाप्रकारे आत व्यथित असणारा नाना कल्पना लढवून, अनेक भूलथापांच पांघरुन आपल्या जमे-वर घालायचा.

मात्र अचानक एक दिवस पारावर भेटलेल्या ब्राह्मणाने मार्गशीर्षात लग्नाचा भक्कम योग आहे पण चोरी, चहाडी करायची नाही, खोट बोलायच नाही, अशी नानाला अट घातली होती, त्यामुळे नानाची वाचाच बसली. मार्गशीर्षात आपले लग्न व्हावे म्हणून नाना हे पथ्य पाळत होता. पण मार्ग-शीर्ष निघून गेल्यानंतरही लग्न झाले नाही. तेव्हा वैतागून नानाने आत्म-हत्येचा प्रयत्न केला. लोकांनी त्याला वाचवला. नाना शुध्दीवर आला

आणि एक गोष्ट त्याच्या लक्षात आली. लग्न नाही ते नाही मग जिभेवर बंधन कशासाठी ? नानाने लगेच सुरवात केली—

"अरे, त्या डव्हात एक जलकन्या राहती. आसरा राहती. मला काय ठावं व्हायी. म्या सूर मारला आन् तिनं गपकन् पाय धरला माजा. मला म्हणाली, "नाना, चल माज्या घरात कायम -हा, आता तुला सोडत न्हायी." आणि मग संध्याकाळच्या त्या शांत, उदास केलेला नानाच्या आयुष्याला पुन्हा एकदा अर्थ आला." [१५]

जीवनातल्या अपूर्णतेचे हे दुःख स्वप्नरंजनाने, काल्पनिकतेने भरून काढायचे हे नानाचे मानसशास्त्र मिरासदारांनी बरोबर हेरून तितक्याच रंजक पध्दतीने कथेत मांडले आहे, त्यामुळे ह्या व्यक्तिचित्राची निर्मिती वैशिष्टयपूर्ण ठरली आहे.

इ) <u>एक सदाशिवराव आणि त्यांची बायको</u> :

एका भोळ्या-भाबड्या, स्वप्नाळू, भित्र्या पण प्रामाणिक अशा प्रोफेसर सदाशिवरावांचे व्यक्तिचित्र या कथेत मिरासदार मोठया रंजकतेने करतात. सदाशिवरावांच्या स्वभावावरच नेमके बोट ठेवून ही कथा पुढे सरकत राहते. सदाशिवरावांच्या स्वभावासारखे अनेक नमुने आपल्याला समाजात पाहायला मिळतात.

प्रोफेसर सदाशिवराव हे चाळिशीला आलेले गृहस्थ. नोकरी व्यवस्थित, पगार भरपूर, अपत्य नाही म्हणून सुध्दा ते दुःखी नव्हते. घरात संपत्तिही भरपूर होती असे असून सुध्दा सदाशिवरावांच मन थोडे दुःखी होते. आपल्यावर खुप अन्याय होतोय असे त्यांना राहून राहून वाटत होते आणि याचे कारण म्हणजे आपली बायको. बायको घरात आल्यापासून गेल्या पंधरा वर्षांत आपल्या स्वातंत्र्यावर गदा आल्याचे त्यांना जाणवते. बायकोची सदाशिवरावावर किती हुकमत होती हे सांगताना मिरासदार वर्णन करतात— "हें करा, तें करा. तें करूं नका, हे करुं नका. पारोसें बसूं नका, आंघोळीला चला. तो फाटका शर्ट

घालूं नका....घरीं लवकर परत या. मित्रांच्या टोळक्यांत फकाटया पिटीत बसूं नका". [१६] यामुळे सदाशिवराव जाम कैतागले होते. एव्हढेच नव्हे तर बायकोने केलेले सर्व पदार्थ भूक नसतानाही निमूटपणे त्यांना खावे लागत. यामुळे त्यांच्या जिभेची चव तर नाहिशी झालीच आणि वजन मात्र वाढू लागले.

या सगळ्या प्रकाराचा सदाशिवरावांना संताप आला. बायकोला चांगलीच वठणीवर आणण्यासाठी ते विचार करु लागले. या परिणामातून बायकोला मारण्याची रोज रात्री स्वप्ने पडणे, बायकोला रहस्यमय भयंकर इंग्रजी चित्रपट दाखवणे, वर्तमानपत्रातील नवरा बायकोच्या भांडणामुळे झालेल्या खुनाची बातमी वाचून दाखवणे, स्वप्न न पडण्याविषयी बायकोने सदाशिवरावांना धमकावणे, चाळीतल्या मोलकरणीला नवऱ्याने बेदम चोपले म्हणून सदाशिवरावांना आनंद वाटणे, त्या आनंदात असतानाच स्वत:ची बायको समोर पाहिल्यावर अंगावर काटा येणे व ती सांगेल त्या सुचनांचे गरीब गायीगत पालन करणे या सर्व प्रसंगातले नाटय मिरासदार खुमासदारपणे चित्रित करतात. प्रो. सदाशिवराव त्यांच्या स्वभावाने लक्षात राहतातच पण त्यांची कीवही येते.

मानवी स्वभावातील विसंगती टिपून मिरासदारांनी ही कथा रंगविली आहे.

ई) <u>गणपत पाटील :</u>

"गणपत पाटील" ही व्यक्तिप्रधान कथा आहे. गाव पाटील असणाऱ्या गणपत पाटलाला गावातील प्रत्येक गोष्ट आपल्या संमतीने घडावी असे वाटत असते. किंबहुना अशा गोष्टींना तो मदतही करत असे. पण जेव्हा एखादी गोष्ट त्याच्या माहितीविना घडते तेव्हा त्याच्या अहंकाराला तडा जातो. आणि मग संबंधिताला अद्दल घडविण्यास तो प्रवृत्त होतो. अद्दल घडलेली व्यक्ती जेव्हा

BARR. BA... ...KAR LIBRARY
SHIVAJI UNI...SITY, KOLHAPUR

त्याच्याकडे शरण येते तेव्हा केलेल्या गोष्टीबद्दल कृतकपश्चाताप व्यक्त करीत उदार अंत:करणाने सारी उस्तवारीही तो करतो.

गणपत पाटील हा गावचा पाटील असल्यामुळे गावातील किरकोळ मारामाऱ्या, भांडणे, तक्रारी सोडवणे, तलाठयाकडून सरकारी कामकाज करवून घेणे, इतर वेळी मोकळ्या गप्पा हाणणे एवढाच उद्योग करीत असे. घरी ज्वारी, ऊसाचे पीक चांगले होते. म्हातारी आई घरचा कारभार बघत होती. तर तरणीताठी बायको मुले, गुरे-ढोरे पाहत होती. त्यामुळे पाटलांना घरचा असा उद्योग नव्हताच. त्यात गणपत पाटलाचा स्वभाव मुळातच विनोदी होता. त्यामुळे अनेक गमती जमतीचे प्रकार घडवून सतत हसत राहणे यामध्ये त्यांना एक प्रकारचा आनंद वाटायचा. असेच एकदा गावातल्या तुकारामाची गंमत करून त्याचा मुलगा, बायको यांच्यात भांडण लावून देऊन आपण हा मजेशीर प्रकार पाहात राहिला. पण पाटील कुत्सित स्वभावाचा नव्हता. तो दिलदार होता. भांडणाची रुजवात घालून, सगळ्यांची समजूत काढून घरी पाठवायचा आणि गडयांना हुकूम करायचा –

"ए,भडव्या, बगत काय हुभा न्हायलास गाडवासारखा ! जा घरचं दोन ऊस काढून दे लेकराला खायला. आन् जनाबाईला पायलीभर ज्वारी घाल जा. पळ. तुकाराम ये येडया, बस्. पानतंबाखू खा."[१७] आणि खरोखच हे सर्व म्हटल्याप्रमाणे पाटील करत असे. त्यामुळे थट्टा-मस्करी होऊन देखील माणस चिडत नसत, रागावत नसत. घटकाभर मौजमजा करून, मायेची पाखर घालणारा स्वभाव. त्यामुळे पाटलावर लोकांचे फार प्रेम होते. त्याच्याविषयी लोकांना आपूलकी वाटे. पाटलासाठी वाट्टेल ते करायला ते सदैव तयार असत.

गणपत पाटील मोठा इरसरीचा गडी होता. पाटलाच्या भावकीतल्या एका विधवा बाईनं आपल्याला न विचारता माहेरच्या माणसाकरवी शेती करण्यास सुरवात केली. त्यामुळे पाटील बिथरतो. बाईने आपली जमीन

कळकावली म्हणून फिर्याद करतो. पण निकाल बाईच्या बाजूने लागतो. यामुळे चिडून पाटलाने सखुबाईची रानातली खोप पेटविली. गडीमाणसांना मारहाण केली. निकाल आपल्या बाजूने लागला असतानाही शेवटी सखु-बाई हतबल होऊन पाटलांना शरण येते. मग मात्र पाटील बाईला म्हणतात – "आगं, उगी गंमत केली म्या. मला काय कळत न्हायी व्हय ?" आणि आपल्या नोकरांकरवी तिची खोप बांधून दिली व इतर नुकसान भरपाईही देऊ केली.

गणपत पाटील यांच्या रूपाने मिरासदारांनी खेड्यातील एक नमुनेदार स्वभावचित्र उभे केले आहे.

ड) <u>निकाल</u> :

ग्रामीण भागातल्या एका बेरकी व्यक्तिचे चित्र मिरासदार "निकाल" या कथेत रेखाटतात. ग्रामीण भागात शेतीवाडीच्या, दत्तकप्रकरणाच्या, भाऊबंदकीच्या अथवा अन्य कारणांवरून कोर्टकचे-या होतात. त्यामध्ये पुरावा हा महत्त्वाचा असतो. ज्या व्यक्ती धूर्त, कावेबाज असतात त्या व्यक्ती अशा प्रकरणांमध्ये महत्त्वाचे काम बजावताना दिसतात. कोर्टकचेरीतील खाचाखोचा माहित असणारी इरसाल मंडळी या गोष्टीचा कसा फायदा घेतात हे "निकाल" या कथेतील "गणपत वाघमोडे"च्या व्यक्तिचित्रणातून मिरासदारांनी मोठ्या मिस्किलपणे दाखविले आहे. मिरासदारांचे शब्द ज्याप्रमाणे गावरान विनोद अचूक पकडू शकतात त्याप्रमाणे ग्रामजीवनातील व्यक्ती आणि वल्लीही नेमके-पणाने रेखाटू शकतात.

"गणपत वाघमोडे" वयाच्या तीस-पस्तीसाव्या वर्षी एका म्हातारीला दत्तक जातो. म्हातारी गचकल्यानंतर तिची सगळी इस्टेट गणपतला मिळाली होती. पण विरूद्ध बाजूच्या लोकांनी असा दावा केला की दत्तकविधान मुळी झालेच नाही. गणपतने म्हातारी मेल्यावर मुड्याचा अंगठा घेऊन खोटीच

BARR. BAL... ...DEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

कागदपत्रे रंगविलीत व इस्टेट बळकावली. तेव्हा गणपतचा इस्टेटीवर खरा हक्क नसून तो आमच्या अशिलाचा आहे, तोच म्हातारीचा जास्त जवळचा नातेवाईक आहे, प्रत्यक्ष नातूच आहे. तेव्हा त्याला सगळी इस्टेट मिळावी.

श्रीयुत उपडे या नामांकित वकिलाकडे गणपत वाघमोडे आपले वकिलपत्र देतो. सुरवातीला उपडे वकील दाद देत नाही. जास्तीत जास्त पैसे उकळण्याचा प्रयत्न करतो. त्यासाठी नवीन आलेला कोर्टातील साहेब पैसे खात नाही. तो कोणतीही लाच स्वीकारत नसून लाच देणा-या माणसाविरुध्द निकाल देतो, इत्यादी कारणे वकील वाघमोडेंना सांगतो. गणपत सर्व काही लक्षापूर्वक ऐकतो पण काहीच न समजल्याचा आव आणतो. उपडे वकीलही गणपत कडून केसची सर्व फी निकालापूर्वीच घेतो आणि गणपतही फारसे आढेवेढे न घेता ठरलेली फी देतो.

कोर्टातील नवीन आलेला साहेब लाच स्वीकारत नाही. केसचा उलट निकाल देतो हे उपडे वकिलांचे म्हणणे पक्के ध्यानात ठेवून त्याचा वापर धुर्तपणाने करुन गणपत वाघमोडे निकाल आपल्या बाजूने लावून घेतो. उपडे वकिलांनाही निकाल पाहून आश्चर्य वाटते. पण तसे न दाखविता गणपतकडे तो बक्षिसी मागतो. आपण केलेल्या परिश्रमाच सार्थक झाल अस म्हणतो. परंतु गणपत वाघमोडे आपली केस आपल्यासारखी कशी झाली याचा पायंट सांगतो— "साहेब पैसे खात न्हाई म्हून तुमीच बोलला न्हवं ? ....कुनी पैसे द्यायला लागलं तर निकाल विरुध्द देतो त्यो. व्हयं का न्हाई ?.... मग तीच आडी केली म्या, .... मी दुस-या माणसांबरोबर पैसे लावून दिलं त्येंच्याकडं. नांव मात्र सांगितलं विरुध्द बाजूचं. मग जे साहेब भडाकलाय म्हणातां ! अरारारा ! काय इचारं ना. न्हाई न्हाई त्यें बोलला त्या माणासाला. पुन्हां फळांची करंडी पाठवली. भाजी पाठविली. जास्तच भडकला गडी. मग काय ? निकाल आपल्यासारखा !"[१८]

गणपत वाघमोडे भोळा-भाबडा आव आणून मोठ्या धूर्तपणे, बेरकी-पणाने नवीन साहेबांचा आपल्या वकिलाकडून अंदाज घेतो व वकिलांवर, साहेबावर व विरूद्ध बाजूच्या लोकांवर बरोबर कुरघोडी करतो. वकील-गणपत यांच्या संवादातून शब्दनिष्ठ विनोद दिसतो.

ग्रामीण भागातील धूर्त, बेरकी व्यक्तीचा अस्सल नमुना "गणपतच्या" व्यक्तिचित्रणातून मिरासदार खास ग्रामीण ढंगात उभा करतात.

इ) प्रसंगनिष्ठ संमिश्र कथा :

मिरासदारांच्या "कळस", "हरवल्याचा शोध", "माझी पहिली चोरी", "मदत", "माझा कै. वृत्तपत्रव्यवसाय" व "चुकामूक" या कथा प्रसंगनिष्ठ परंतु संमिश्र अशा स्वरूपाच्या विनोदी कथा आहेत. या सर्वच कथामधून पात्रे, प्रसंग एकमेकात इतके गुंफले आहेत की त्यांना वेगळे काढता येत नाही. प्रसंगातले नाट्य आणि व्यक्तिंचे त-हेवाईक बेरकी स्वभाव यांचा सुंदर मेळ मिरासदार या कथांतून साधतात.

अ) कळस :

ग्रामीण जीवनातल्या व्यक्तिप्रमाणेच तेथे घडणारे गंमतीदार प्रसंग आणि किस्सेही मिरासदार सांगतात. "कळस" या कथेचे स्वरूप कथेपेक्षा किस्सेवजा आहे. खेडेगावात लोकवस्ती तशी कमीच असल्याने, सर्वांचाच व्यवसाय धंद्यानिमित्त संबंध येतो, शहरी गजबजाट तेथे नसल्याने तेथील शांत जीवनात एखादी बारीक घटना जरी घडली तरी तिचे पडसाद सर्वत्र उमटतात आणि मग ती गोष्ट गावच्या चर्चेचा विषय होते. शिवाय पैलवानासारखी एखादी बलदंड व्यक्ती गावात असली तर तिची सा-या गावावर जरब असते याचे दर्शन "कळस" या हकीगतीतून येते.

गावातल्या जगण्याची उठवळ आणि चवचाल बायको माहेरी जायचे निमित्त करून कुणाबरोबर तरी पसार झाल्याची बातमी गावभर पसरते.

महादेवाच्या देवळात रात्री झोपणाऱ्या तुका बनकर या पैलवानासोबत गप्पा मारायला आलेल्या चांडाळ-चौकडीत नामा चौगुले, सदा वाणी, गणपत वाघमोडे आणि रामा खरात यांच्यात वरील विषयाची चर्चा सुरु होतो. ते चौघेही या विषयात रस घेऊन चर्चा करतात. पण तुका पैलवान मात्र घुम्या सारखा गप्प राहतो. आणि नंतर "तुमी निव्वळ गाडव हायेत् लेकानू. आपण काय बोलावं, कुठं बोलावं, ह्याच्या काही अक्ला न्हायीत तुमास्नी .।" ........ लेकानूं काय इचार ? ... हे म्हादेवाचं देऊळ. आपन हितं काय बोलावं, काय बोलूं ने, एवढंसुदिक कळू ने का ? देवाच्या पायापाशी ह्यो फाजीलपणा करायचा म्हंजे काय म्हणावं तुमास्नी ?" [१९] असे म्हणून त्यांना गप्प करतो. गावच्या पैलवानानं असा दम दिल्यावर कुणाची मान वर करुन बोलायची ताकद आहे ?

मात्र तुका पैलवान बेरकी आहे. देवळात आलेल्या चौघांनाही घरी पिटाळण्यासाठी एक युक्ती काढतो. म्हादेवाच्या देवळाच्या कळसाचे बांधकाम सुरु करायचे, त्यासाठी वर्गणी गोळा करायला हवी. आणि वर्गणीचा विषय निघताच चौगुले, सदा वाणी, गणपत वाघमोडे, रामा खरात हळूहळू काढता पाय घेतात. सगळेच देवळातून आपापल्या घरी निघतात. मग मात्र दाट अंधारातून देवळाच्या ओवरीतून राधी बाहेर येते आणि तुकारामाला भेटते. तुका पैलवानानेच तिला ठेवलेली असते.

गावातली कुणी उठवळ स्त्री संसार सोडून पळून जावी आणि तिला त्या गावातल्याच कुणी पैलवानानं ठेवावी ही हकीकत या किस्याच्या रुपाने मिरासदारांनी सुंदर वातावरणनिर्मिती करीत रंजकपणे कथन केली आहे. तुकारामाने जणू आपल्या कृतीने "कळस"च गाठला आहे.

आ) हरवल्याचा शोध :

सुंदर वातावरणनिर्मिती करीत अखेरीस कलाटणी देऊन अपेक्षाभंगाच्या-

द्वारे विनोदनिर्मिती करण्याचे मिरासदारांचे कौशल्य "हरवल्याचा शोध" या कथेमध्ये प्रकट झाले आहे.

इनामदाराचा जावई असलेला कथेचा नायक हौसेने रपेट करण्यासाठी सास-याच घोड घेऊन जातो. जावई पाणी पिण्यासाठी ओढयावर जातो तेव्हा तेथील पोरे घोडयाचा लगाम ओढतात. त्यान घोडं बिथरत आणि रानात पळून जाते. नायक रानातला चिखल तुडवीत त्याचा शोध घेत राहतो. मासे पकडत असणा-या तिघा-चौघाकडे तो घोडयाची चौकशी करतो. ते चौघेजण जावयांकडून पान खातात आणि घोडेच काय, घोडयाच शेपूट देखील दिसल नाही, असे म्हणून त्याला वाटेला लावतात. पुढे भेटलेल्या एका म्हातारीलाही तो घोडयाबद्दल विचारतो. पण वकील झालेला इनामदारांचा जावई म्हणून ती "आपल्या शेताला वाट मिळेल का ?" असा कायद्याचा सल्ला विचारते. तो नकारार्थी उत्तर देतो तेव्हा ती चिडते आणि त्याला काही-बाही बोलते, पुढे एक म्हातारा भेटतो पण त्याच्याकडूनही घोडयाविषयी काही माहिती मिळत नाही.

असा घोडयाच्या शोधात थकून निराश झालेला नायक रस्त्यावर बसला. आभाळ भरून आलेल, अंधार होऊ लागलेला आणि रस्त्यावर आजूबाजूला कोणी नाही अशावेळी त्याला एक साळुंखीच्या आवाजाची देखणी बाई भेटते. तिच्याजवळ तो घोडयाची चौकशी करतो. तिच नावगाव विचारतो. ती आपल नाव "राधी" अस सांगते. शिवाय, आपला बाप आता घरी नसून, रात्री परतेल अशी अधिक माहिती देते. तिच गोरपान अंग, सरळ नाक, चिंचेच्या फोकासारखी अंगलट पाहून तिच्याशी चार गोड शब्द बोलावे असे त्याला वाटते. तीही "ह्या अंगालासमदं आमचंच रान हाय. बुकली-वाकलेली जनावरं तितचं येत्यात नेमकी." असं सांगते.[२०] तेव्हा आपले घोडही तिथच असणार अशी नायकाची खात्री (!) होते आणि तो तिच्याबरोबर चालू लागतो.

आभाळ भरून आलेले, अंधार होत आलेला अशा वेळी एकान्तात या तरुण स्त्रीबरोबर घोडयाचा शोध घेण्यासाठी चालताना वेगळाच आनंद नायकाला वाटत होता. अंधारात चुकामूक नको म्हणून तो तिच्या जवळून चालतो, मध्येच रस्ता निसरडा होता म्हणून तिचा हात हातात घेतो. काही वेगळयाच आनंदात त्याच मन उतू जात. एवढयात समोरून काही माणसे येताना दिसतात. ती जवळ आल्यावर नायक पाहतो; तो पहिल्यांदा भेटलेली ती चार माणसे आणि त्यांच्यामध्ये असते नायकाचे घोडं ।

घोडयाचे हरवणेही भलत्या वेळी आणि सापडणेही त्याहून भलत्या वेळी. पावसाळ्यातल्या अंधा-या वेळी नायक आणि तरुणी यांचे एकांतातले चालणे, जवळ येणे, हात धरणे असे वर्णन करीत मिरासदार वातावरण कळसाकडे नेतात आणि लगेच चार माणसे आणि घोडे यांच्या अनपेक्षित आगमनामधून कथेला अपेक्षा भंगाचा धक्का देणारी कलाटणी देतात. कलाटणीतून निर्माण होणा-या प्रसंगनिष्ठ विनोदामूळे हा शेवट वाचकाला जसा हसवतो तसा स्तिमितही करतो. वाचकांचे मनोरंजन करण्याचा मिरासदारांच्या तंत्राचा आणि कौशल्याचा प्रत्यय येथे मिळतो.

इ) <u>माझी पहिली चोरी</u> :

"माझी पहिली चोरी" ही मिरासदारांची उल्लेखनीय विनोदी कथा आहे. मिरासदारांच्या विनोदाचे उपहासात्मक स्वरूप या कथेत पहावयास मिळते. सर्वसामान्य माणसांच्या दैनंदिन जीवनात आढळणा-या लहानमोठया विसंगतीवर प्रकाश टाकत त्याचे उपहासपर शैलीत मिरासदारांनी येथे नायकाच्याद्वारे निवेदन केले आहे.

आता आपण अट्टल चोर झालो असलो तरी एकेकाळी अत्यंत उदार आणि सज्जन, गृहस्थ होतो असे कथेचा नायक सांगतो. दुस-यांचे पैसे उसनवार घेऊन ते परत न करणे, दुस-याचे मागुन आणलेले पुस्तक हरवून टाकणे, आलेल्या

पाहुण्यांची शक्य तितक्या लौकर रवानगीची व्यवस्था करणे, जो समोर नसेल त्याची कुचाळकी करणे अशी सभ्य (?) गृहस्थाची लक्षणे तो सांगतो. आता आपण चोर कसे झालो त्याची हकीकत नायक सांगतो.

एका रात्री नायकाच्या माडीवरची भिंत फोडून कुणीतरी चोरी केली. मग चार शहाण्या माणसाप्रमाणे ट्रंका, कपाटे धुंडाळून आपले काय काय चोरीला गेले याचा त्याने हिशेब केला. सोने-नाणे, चांदीची भांडी व ठेवणीची कपडे मिळून दोन हजाराचा टोला बसला होता. दिवसरात्र कष्ट करून मिळविलेले एका रात्रीतनाहीसे झालेले बघून नायकास अनिष्ठासारखे झाले आणि त्याने पोलिसात वर्दी दिली.

तासादीडतासाने पोलिस, फौजदार आले आणि त्यांनी पंचनामा केला. फौजदार आणि नायक यांचा संवाद, फौजदार निघून गेल्यावर शेजा-यापाजा-रच्या मंडळींनी केलेली चोरीविषयी चर्चा व नायकाला केलेला उपदेश, नंतर गावातल्या लोकाची गर्दी, नायकाने, त्याच्या मुलाने व बायकोने लोकांना पुरविलेली चोरीची माहिती, आलेल्या लोकांच्या चहा-फराळाची व्यवस्था, परत फौजदारकडे जाऊन आल्यावर "पुढे काय झाले ?" याची पुन्हा लोकांची चौकशी, वर्तमान पत्रात नायकाच्या घरच्या चोरीची बातमी वाचून आलेले नातेवाईक आणि त्यांना नायकाने दिलेली चोरीविषयीची माहिती या सर्व घटनांमधून मिरासदार शब्दनिष्ठ तर कुठे प्रसंगनिष्ठ विनोदाची पेरणी करत कथा पुढे सरकत ठेवली आहे.

पन्नास-पाऊणशे मंडळीच्या जेवणाची व्यवस्था करण्यात नायक गुंतला असता त्याच्या मनात एक विचार आला की अनायासे खर्च होतोच आहे तर याच गडबडीत पोराची मुंजही उरकून घ्यावी. पण "या दु:खाच्या प्रसंगी आम्ही तुमचे सांत्वन करायला आलो आहोत. अशा वेळी मुंजीची मंगल गोष्ट नको" असे म्हणून सर्वांनी तो विचार हाणून पाडला.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

आलेली मंळी आठ दिवस झाले तरी मुक्काम हलविनात तेव्हा नायकाचे खरोखरच सांत्वन करण्याची पाळी आली. आठ दिवसातच चारशे-पाचशेचा खर्च झाला. पाहुणे मंळी आणखी आठ-दहा दिवस राहिली तर त्या खर्चा-चा आकडा चोरीच्या आकड्यापेक्षा अधिक डौलदार दिसू लागेल. अशी नाय-काला धास्ती वाटू लागली. अजुनही घरी येणा-यांची गर्दी हटत नव्हती. त्यामुळे माडीचा जिना पडायच्या बेतात आला.

अशा स्थितीत काय करावे अशा विचारात नायक पडला आणि या कटकटीतून सुटण्याचा एकच मार्ग त्याने पत्करला.—

"एका अपरात्री मी हळूच उठलो. हातात कुदळ घेतली. शेजा-याच्या भिंतीला प्रचंड भगदाड पाडले-आणि मग मी त्या घरात बेरडपणाने घुसून चोरी केली. मग मात्र आमच्याकडचे पाहूणे हलले. आमच्या दाराशी लागलेली लोकां-ची रांग शेजारच्या घरी लागली. माझे घर पूर्ववत् शांत झाले, निर्मळ झाले.

ही माझ्या आयुष्यातली पहिली चोरी ।[२१]

"माझी पहिली चोरी" या कथेची प्रकृती इतर कथेहून वेगळी आहे; अतिशयोक्तीवर आधारित असलेल्या विनोदाच्याद्वारे सामाजिक टीका कर-ण्याचा हा प्रयत्न आहे. कथेच्या अखेरच्या भागात तर अतिशयोक्तीचीही अतिशयोक्ती होते. स्वत: मिरासदार आपल्या कथेविषयी म्हणतात,—
"माझी पहिली चोरी" या गोष्टीतील विनोदही वेगळा आहे. त्याचे वातावरण वेगळे आहे. "ग्रामीण" असे त्यात काही नाही. त्यातील विनोद हा विनोद नसून ती एक प्रकारची सामाजिक टीका (सोशल सटायर) आहे. अतिशयोक्तीचा आधार घेऊन ती केली आहे, इतकेच." [२२]

मनुष्यस्वभावातील दौर्बल्याचे गंमतीदार विडंबन ते येथे करतात. मिरास-दारांनी सामाजिक टीका करण्यासाठी "माझी पहिली चोरी" सारखी कथा

लिहिली गेल्याचे 'माझ्या विनोदाची उलटतपासणीत' नमूद केले आहे. वास्तविक, कथाकाराने अथवा साहित्यिकाने सामाजिक टीका वगैरे करण्याच्या भानगडीत जाणीवपूर्वक पडण्याचे काहीच कारण नाही. कारण ही निष्ठा कलाबाह्य आहे.

ई) मदत :

पुणे शहरात जलप्रलय झाल्याची वर्तमानपत्रातील बातमी भोकरवाडीच्या समस्त मंडळींना समजते. पुण्यातल्या लोकांना इतर लोकांकडून काही ना काही मदत मिळते म्हणून भोकरवाडीचे लोकही पुण्यातील लोकांना काहीतरी मदत करावी असा विचार सुरू करतात. या प्रसंगावर मिरासदारांची ही कथा उभारलेली आहे.

पुण्याचा आणि भोकरवाडीचा जवळचा संबंध होता. तो लेखकाने अतिशयोक्तीचा आधार घेऊन सांगितला आहे. या घनिष्ठ (१) संबंधामुळेच समस्त भोकरवाडीकर मंडळी पुण्यातील लोकांना मदत करण्यासाठी गणा मास्तरच्या घरी बैठक भरवितात तिचे हुबेहूब चित्रण मिरासदार आपल्या खास शैलीने करतात.

गणा मास्तरने वर्तमानपत्रातील पुण्याच्या जलप्रलयाची बातमी वाचणे, त्यावर चेंगट व जमदाडयाने अभिप्राय नोंदवणे, आणि बैठकीचा शेवट यातील नाटय मिरासदार खुमासदारपणे रंगवितात. बैठकीत गणा मास्तरने सांगितले की जुने कपडे, अन्न, पैसे जे जे शक्य आहे ते ते जमा करून पुण्याला पाठविणे. यामध्येही कुणी काय जमा करायचे याबद्दल वाद, पेपरमध्ये बातमी येणार म्हणून आनंद, चेंगट आणि रामा खराताची हातघाई, इतरांनाही त्याचा मिळालेला प्रसाद अशाप्रकारे बैठक संपली.

पुण्याला मदत पाठविण्याच्या निमित्ताने चेंगटाने सका-सकाळी आनशी सुतारणीचे घर गाठले पण त्याला मदत न मिळता मारच मिळाला. गणा मास्तरने थोडी मदत मिळविली, तर शिवा जमदाड्याला काहीच मदत मिळाली नाही. बाबू पैलवानाने जमविलेली मदत त्याच्याच शब्दात सांगायची तर - "मदत मागितली. न्हाई दिली. मग माजं डोस्कंच गेलं. उचलला की आपटला" याचा परिणाम एवढाच झाला की बाबूच्या अंगात आले असून तो पिसाळल्या-सारखा हिंडतो आहे, भेटेल त्याला उचलून आपटतो आहे, असे वृत्त सगळ्या गाव-भर पसरले. गावात हाहा:कार माजला. सगळी माणस धूम पळाली.

बाबूच्या या पराक्रमाने सगळेच थक्क झाले. पाटील चॅप्टरकी करतील या भितीने गणा मास्तरने मदत मागण्याचे बंद म्हणून सांगितले. यावर बाबूची प्रतिक्रिया पाहण्यासारखी आहे_ गणा मास्तरचे बोलणे ऐकल्यावर बाबूच्या तोंडावर निराशा पसरली. बराच वेळ तो काही बोललाच नाही. शेवटी सुस्कारा सोडून तो म्हणाला,_"तुमीच आसं हातपाय बांधल्यावर मी गरीब काय करनार ? मग आतां एवढं तरी करा . माझा ह्यो फाटकां अंगरखा आन् धोतार जुन्या मालांत घालून पाठवा. तेवढीच माजी मदत...."[२३] अशा प्रकारे हास्याचा फटकारा देऊन मिरासदारांनी कथेचा शेवट केला आहे.

जलप्रलयामुळे नुकसान झालेल्या पुण्यातील लोकांना "मदत" करणे ही खरे तर गंभीर आणि जबाबदारीची घटना परंतु तिच्यात सहभागी होणाऱ्या व्यक्तींच्या स्वभावातील आणि वर्तनातील विसंगती मिरासदार येथे टिपतात. त्याबरोबरच गणा मास्तर, बाबु पैलवान, रामा खरात, नारायण चेंगट, शिवा जमदाडे या पात्रांच्या साह्याने मिरासदारांनी संबंध भोकरवाडीच उभा केली आहे आणि कोणत्याही खेड्यात असा प्रसंग आला तर "मदत" कथेची निश्चित आठवण झाल्याशिवाय राहणार नाही. यातच लेखक मिरास-दारांच्या कथेच यश सामावलेल आहे.

[illegible library stamp]

उ) माझा कै. वृत्तपत्र व्यवसाय -

"माझा कै. वृत्तपत्र व्यवसाय" ही कथा मिरासदारांनी आत्मनिवेदनात्मक पध्दतीने सांगितली आहे. वृत्तपत्र व्यवसाय आणि त्यातून निर्माण होणारे प्रसंग रंजक बनले आहेत.

निवेदक सांगतो की आपल्याला लहानपणापासूनच वृत्तपत्रव्यवसायाबद्दल प्रेम होते. त्याचे दाखलेही तो देतो. कॉलेजचे शिक्षण संपल्याबरोबर एका स्थानिक दैनिकात उपसंपादकाची नोकरी मिळाली आणि आपल्या आयुष्याचे सार्थक झाल्यासारखे त्याला वाटले. हा व्यवसाय निवडण्याचे आणखीही काही कारणे तो सांगतो. पण एके दिवशी हा वृत्तपत्र व्यवसाय त्याला सोडावा लागतो. आणि याला कारण म्हणजे पैसा. पैशाचे शास्त्र "अर्थशास्त्र" नावाचे जड्जंबाल प्रकरणं. त्याविषयी निवेदक जी माहिती देतो तिही पाहण्यासारखी आहे.

निवेदकाची सुरवातीची स्फुटे, शेअर बाजारातील उडालेल्या घबराटीचा प्रसंग, आणि निवेदकाने त्यावर तयार केलेली बातमी, बातमीच्या शेवटी "हे रूपये अजून सांपडलेले नाहीत" हे वाक्य आणि दुसऱ्या दिवशीची संपादकांची त्यावरची प्रतिक्रिया, निवेदकाच्या अग्रलेखांवरील कंपॉझिटरचा अभिप्राय, २८ फेब्रुवारीला फुटणार बजेट आणि त्यावर निवेदक व संपादक यांचा संवाद, कोर्टातील चपराश्याला बजेटविषयी विचारलेले प्रश्न आणि त्याचे उत्तरे, बजेट घेऊन आल्यानंतरचा संपादक व निवेदकाचा संवाद या सर्व प्रसंगातून मिरासदारांनी मानवी विसंगतीमधून, शाब्दिक चकमकीतून विनोद निर्मिती साधली आहे.

संपादक निवेदकाला बजेटची बातमी तयार करायला सांगतात. निवेदक जी बातमी तयार करतो ती वाचून संपादकांनी एकदम मॅनेजरला बोलावून सांगितले- "यांना सबंध महिन्याचा पगार द्या अन् रिक्षा करून घरी पाठवून द्या."

निवेदक सांगतो आज मी पी.डब्ल्यू.डी. ऑफिसमध्ये निवांतपणे काम करीत आहे. पण "अठ्ठावीस फेब्रुवारीचा तो दिवस आठवला की अजून अंगाला

कापरे भरते. अधूनमधून केंव्हातरी भयंकर स्वप्न पडते....

..... अठ्ठावीस फेब्रुवारी. ......

..... आणि मोठी किंकाळी फोडून मी जागा होतो. सगळ्या अंगाला दरदरून घाम सुटलेला आहे हे ध्यानांत येते. मग असले दुष्ट स्वप्न पडूं नये म्हणून मी त्या दिवशी पुन्हा झोपींच जात नाही."[२४]

कोणत्याही कामासाठी फक्त पुस्तकी ज्ञान असून चालत नाही तर त्या जोडीला व्यवहारज्ञानही आवश्यक असते. "माझ्या कै.वृत्तपत्रव्यवसाय" या कथेत मिरासदार याचा प्रत्यय आणून देतात.

ऊ) चुकामूक :

बापू तांबटाच्या मेव्हणीचा लहानसा मुलगा चुकतो आणि त्याचा पत्ता लागेपर्यंतचे जे प्रसंग निर्माण झाले त्याचे वर्णन चुकामूक या कथेत मिरासदार अत्यंत खुमासदारपणे करतात. या निवेदनातून खेड्यातील माणसांच्या मानसिकतेवर लेखकाने प्रकाश टाकला आहे.

शिवा जमदाडे दुपारच्या वेळी घरी शांतपणे पडला होता. इतक्यात त्याला एका लहानशा मुलाच्या रडण्याचा अस्पष्ट आवाज येतो. शिवाने पाहिले तर दोन-अडीच वर्षाचा, अंगावर कपडे नसलेला मुलगा हुंदके देत होता. शिवाने जवळ जाऊन मुलाची विचारपूस करण्याचा प्रयत्न केला, पण त्या लहान मुलाने रडण्यापलीकडे कसलाच प्रतिसाद दिला नाही. शिवाला आठवले की चार घरा पलिकडच्या पा-या गवळ्याची आठ-दहा पोरे आहेत. त्यापैकी हे एक असावे म्हणून तो चौकशीसाठी त्याच्या घरी जातो. परंतु पा-या गवळ्याची टवळी बायको शिवाला काही दाद देत नाही. तिचे उर्मट उत्तर ऐकुन शिवाने आपला मोर्चा परत फिरविला. इतक्यात त्याची भेट बाबू पैलवानाशी होते. या प्रसंगातून कुठे स्वभावनिष्ठ तर कुठे शाब्दनिष्ठ विनोद घडत जातात.

चुकलेलं पोरग कुणाच यावर शिवाचे व बाबू पैलवानाचे भांडण जुंपते लोक जमतात. पण या भांडणात मधाच पोरगच नाहिसे होते. परत त्याला शोधल जात. यावेळेच्या म्हाता-या काका सोनाराच्या व पांडू लव्हाराच्या संवादातून उपरोधिकपणाचा सूर दिसतो व मुळ विषयात चांगलाच रंग भरतो.

शोधून आणलेल्या मुलग्याची जमलेले लोक कशी चर्चा करतात तो प्रसंग मिरासदार पात्रांच्या लकबी, स्वभाववैशिष्टयांसह वास्तवपूर्णतेने रेखाटतात. पहा -

"हेकणा सखाराम आपल्या एकाच धड डोळयाने त्या पोराकडे निरखून बघत एकदम म्हणाला,

"कक ! आन्, नागडंच हाये पोरगं. कापडं आसतं अंगावर म्हंजे
सांगाया आलं आसतं काय तरी."
म्हातारा काका सोनार मान हलवीत तुच्छतेने म्हणाला, "व्हय का ?
नागडं हाये एवढं तुला दिसलं हे काय थोडं हाये का ?...
काय लेका बोलतोस ! हयँ : !"
"आसं हाये - माजं म्हणान एवढंच की.."
"काय बाबा ?"
"न्हाई, कापडं अंगावर आसती त्येच्या म्हंजे"
"नागडं म्हनलं नसतं. व्हय ना ?"[25]

शाब्दिक फटमार करीत काही प्रसंग मिरासदार रंगतदार बनवितात.

त्यानंतर गर्दीत पांडबा लव्हार, सुताराची आनशी हे पोरग कुनाच असाव यावर मत प्रदर्शन करतात. शेवटी हे पोरग बापू तांबटाच आहे किंवा नाही हे ठरेपर्यंत त्या मुलाला कुणीतरी घरी न्याव अस प्रत्येकजण दुस-यालाच सुचवित असतो. कोणीही आपणाहून ती जबाबदारीस्वीकारत नाही.

शेवटी कंटाळून शिवा जमदाडे त्या मुलाला घरी नेण्यासाठी उचलून खांद्यावर घेतो. त्यावर इतर मंडळी शेरेबाजी करतात. इतक्यात बापू

तांबटाची बायको येते व मुलाला ताब्यात घेते.

मग मात्र बाबू पैलवानाला बळ येते. त्या प्रसंगीचे त्याचे बोलणे आणि जमलेल्या मंडळीपैकी एक-दोघांनी बाबूचीच बाजू घेणे आणि तेवढयात "हे तुज लेकरू हाये का ?" या सुताराच्या आनशीच्या प्रश्नावर बापू तांबटाच्या बायकोचे उत्तर कथेला कलाटणी देणारे आहे. "क्या.! माज कुटलं लेकरूं ? भैणीच हाये माझ्या. कालच आलिया ती गावावरनं..."

मग मात्र कुणी काही बोलले नाही तेव्हा शिवा उपरोधाने म्हणाला,

"का बाबू, आतां कसं ?"

बाबू दमदाटीच्या सूरात बोलला,

"मग काय झालं ? जरा चुकामूक झाली.!...

माज्या बोलण्यात काय फरक झाला ? तांबटाच्या घरचंच पोरगं निगालं का न्हाई ?

आँ ?"

आणि परत बाबूची आणि शिवाची हाणामारी सुरू झाली. त्याबरोबर निघालेले लोक पुन्हा थांबले. आता नवीन गंमत बघायला मिळणार या कल्पनेने त्यांच्या अंगावर आनंदाचा काटा आला. असा कलाटणी देणारा शेवट करून मिरासदार कथा संपवतात.

लहान मुलाचे हरवणे, त्याबद्दल लोकांचे तर्कवितर्क आणि बाबू पैलवानाचे आणि शिवा जमदाडयाचे भांडण या प्रसंगाची निर्मिती अत्यंत विनोदपूर्ण रितीने करून मिरासदारांनी कथा सजविली आहे.

ए) <u>झोप</u> :

आकर्षक कथनपद्धतीच्या सामर्थ्यावर "मिरासदारीकथा" यशस्वी कशी होते याचे चांगले उदाहरण म्हणजे "झोप" ही कथा होय. नागू गवळ्याची

झोप, त्याच्या झोपेने केलेले चोराचे हाल आणि पत्निबरोबर झालेली बोलाचाली या प्रसंगाचे मिरासदारांनी आपल्या नेहमीच्या रंजकपध्दतीने विनोदपूर्ण दर्शन घडविले आहे.

सपाटून झोप हे नागुचे वैशिष्टय विशद करताना मिरासदार म्हणतात, "झोप हा नागू गवळ्याचा हातखंडा विषय होता. तो विद्वान असता तर या विषयावर तासन्‌तास बोलू शकला असता. म्हणजे तितका वेळ तो जागा असता तर इतका त्याचा या विषयातला अधिकार दांडगा होता. लग्नापूर्वी झोपेशिवाय कोणत्याही दुसऱ्या अवस्थेत तो इतरांना आढळला नव्हता. पण त्यावेळची गोष्ट निराळी. इतर सगळ्या पुरूषाप्रमाणे त्या- वेळी तो राजा माणूस होता. पहाटे उठून मेहनत करावी, दूध पिऊन जे झोपावे ते दुपारी जेवायच्याच वेळेला जागे व्हावे, जेवल्यावर पुन्हा जे पडावे ते संध्याकाळी मेहनत करायलाच उठावे, आणि नंतर रात्री पुन्हा ताणून द्यावी. असा त्याचा त्यावेळेचा सुरेख कार्यक्रम असे. लग्नानंतर मात्र ते शक्य नव्हते. कारण त्याच्या वाढत्या प्रपंचाने-सहा सात म्हशी, तितकीच लेकरे, आणि अवाढव्य अंगाची एक बायको इतक्या सगळ्यांची उस्तवार करायची म्हटल्यावर त्याला झोपेला वेळ कुठून मिळणार ?" [२६]

नागुचे मित्र कुणी पोलीस खात्यात शिरले; कुणी मोठी धाडसाची कामे करीत होते. आपणाही अशी धाडसाची कामे करून दाखवावी, असे त्याला सारखे वाटे. पण या झोपेने त्याचा घात केला होता. काहीतरी अजब करून दाखविण्याचे आपले मनोगत तो बायकोला सांगे. त्यावेळेचा त्या पति-पत्निचा संवाद कौटुंबिक नाते संबंधावर प्रकाश टाकतो आणि कुटुंबातील ऐतखाऊ पुरूषप्रधान संस्कृतीचेही दर्शन घडवितो. नेहमीच्या पध्दतीच्या वर्ण- नातून नागूच्या झोपेचे स्वरूप सांगता आल नसत इतके या संवादाद्वारे मिरास- दारांनी ते परिणामकारकपणे कथन केलयं.

नागू गवळयाच्या घरात रात्री शिरलेल्या चोराने नागूच्या बायकोजवळ किल्ली मागणे, तिने आपल्या नव-याकडे बोट करणे, चोराचा मोर्चा नागूकडे वळणे, चोराने झोपलेल्या नागूच्या छातीवर गुडघा रोवून बसून त्याला धमकावणे, नागूच्या जोरदार शिंकेचा चोराच्या तोंडावर फवारा उडणे, चोराने नागूला जोरजोरात घुसळणे, नागूने चोराला म्हैस समजून बोलणे, नागूला मारून दमल्यामुळे चोराला घाम येणे, आणि चोरी न करताच सकाळी आपले काळे तोंड घेऊन चोराने पोबारा करणे या सर्व घटनातले नाटय मिरासदार खुमासदारपणे रंगवितात.

वाचकांना विस्मयाचा धक्का देऊन कथेचा शेवट करण्याच्या तंत्रात मिरासदार सिध्दहस्त आहेत. त्याचा प्रत्यय येथेही येतो. सकाळी उजाडल्यावर कपाळावरच्या जखमेत हळदचुना भरता भरता रात्रभरचा सगळा प्रकार ऐकल्यावर नागू आपल्या बायकोला जे बोलतो तो प्रसंग पहा - "अगं, एवढा मोठा चोर येऊन गेला घरात. मला उठवायचं न्हायीस ! .... आ ! ... चांगलं भुस्कट पाडलं आसतं की त्येचं मी. ह्यँ ! .... दाब चान्स आला हुता. पर घालवलास तू..." हे बोलता बोलता तो झोपी गेला. नागू गवळयाची राक्षसी झोप आणि तिच्यामुळे निर्माण झालेला नाटयपूर्ण प्रसंग अधिक लज्जतदार आणि विनोदी झाला आहे. तो मिरासदारांच्या कथनशैलीमुळे. कुठे प्रसंगनिष्ठ तर कुठे व्यक्तिनिष्ठ प्रकारचा विनोद अतिशयोक्तीच्या पातळीवर या कथेत घडतो.

## मिरासदारांच्या कथेतील विनोदाचे स्वरूप :

द.मा. मिरासदार प्रामुख्याने ग्रामीण जीवनातल्या विसंगतीवर आपले लक्ष केंद्रित करतात. त्यातील रंजक असलेले विषय मिरासदारांच्या कथेला चटकन विनोदी पातळीवरचा रंजकपणा आणून देतात. बढाईखोर, अहंमन्य, इरसाल, थापाडे, विक्षिप्त अशा माणसामुळेही येथे विनोदनिर्मिती झाली आहे. विनोदयोग्य विषय आणि व्यक्ती, प्रसंग यांच्या चित्रणाला मिरासदारांच्या

मिस्कील निवेदन पध्दतीची जोड मिळाल्यामुळे तर या विनोदाची रंगत आणखीनच वाढली आहे.

मिरासदारांच्या कथेतील विनोद अधिकांश प्रसंगनिष्ठ आहे आणि नंतर व्यक्तिनिष्ठ आहे. शहरी असो की ग्रामीण असो माणसाच्या ठिकाणी असणाऱ्या हास्यास्पद प्रवृत्ती, मिरासदार नेमक्या टिपतात. माणसाचा तऱ्हेवाईकपणा, विक्षिप्तपणा, यामुळे जीवन व्यवहाराला येणारी रंगत त्यांना महत्वाची वाटते. तिचा शोध घेऊन ते चित्रण करतात.

"माझ्या बापाची पेंड", "माझी पहिली चोरी", चुकामुक", "हरवल्याचा शोध", "मदत", "माझा कै.वृत्तपत्रव्यवसाय", "काकांची गंभीर गोष्ट", "झोप" या कथामधील विनोदाचे स्वरूप प्रसंगनिष्ठ असे आहे.

"शाळकरी इरसाल पोराने शेंगांची पेंड समजून गांजा खाणे आणि शाळेत त्याचा "चमत्कार" दिसणे; बाबू मास्तरांनीही त्याची वानगी चाखल्यानंतर त्यांचे रंगात येणे (माझ्या बापाची पेंड), नायकाच्या घरी चोरी झाल्याचे समजताचं चौकशीसाठी येणारे पोलीस खाते, शेजारपाजारी व नातेवाईक मंडळी, त्यांनी निवेदकाला केलेला उपदेश आणि या सर्वावर नायकाने काढलेला तोडगा (माझी पहिली चोरी) , हरवलेल्या लहानशा मुलाबाबतचे जमलेल्या मंडळींचे तर्क-वितर्क व बाबू पैलवान आणि शिवा जमदाड्याचे भांडण (चुकामूक), हरवलेल्या घोड्याच्या शोधात असताना एकटी भेटलेली स्त्री पाहून नायकाने चळणे आणि तेवढयात घोडे सापडणे (हरवल्याचा शोध), जलप्रलय झालेल्या पुण्यातील लोकांना मदत करण्यासाठी सज्ज झालेली समस्त भोकरवाडीकर मंडळी (मदत), नायकाची वृत्तपत्रव्यवसायातील उपसंपादकाची नोकरी आणि संपादकाशी संवाद (माझा कै.वृत्तपत्र व्यवसाय), नागू गवळ्याची महाकाय झोप आणि त्याच्या झोपेमुळे झालेली चोराची फटफजिती (झोप) अशा प्रसंगांमधून हा विनोद घडलेला आहे. अर्थात ही प्रसंगनिर्मिती करीत

असताना उपहास आणि उपरोधाच्या छटाही या विनोदात मिसळल्या आहेत . तर काही ठिकाणी मनुष्य स्वभावातील विसंगतीवरही विनोद आधारलेला आहे.

"माझी पहिली चोरी" या कथेतील विनोदाचे स्वरूप मात्र वेगळे आहे. "सोशल सटायर" लिहिताना निर्माण झालेला विनोद प्रामुख्याने उपहासामुळे झाला आहे. पण कथेच्या उत्तरार्धातील विनोद मात्र अतिशयोक्तीमुळे निर्माण झाला आहे. तर कथेच्या अखेरी-अखेरीस अतिशयोक्तीची अतिशयोक्ती झाली आहे.

मानवी स्वभावातील विसंगतीवर आधारित विनोदाचे सुंदर दर्शन "व्यंकूची शिकवणी", "काकांची गंभीर गोष्ट", "एक सदाशिवराव आणि त्यांची बायको", "ड्रॉईंग मास्तरांचा तास", "खेड्यातील एक दिवस", "निकाल" या कथामधून घडते. अर्थात या विनोदातही उपहासाच्या सुंदर छटा मिसळलेल्या आहेत. ग्रामीण जीवनात कधी कधी कोण कुणाला कसे "शिकवितो" याचे विनोदपूर्ण दर्शन मिरासदार उपरोधाच्या अनेक छटांनी घडवतात. (व्यंकूची शिकवणी), काकांचे प्रेत ताब्यात घेण्यासाठी गेलेली चाळकरी मंडळी, हॉस्पिटलमधील डेड बॉडीज वॉर्डमधला शिपाई, अंत्यविधिसाठी स्मशानभूमीत आलेला भटजी या सर्वांच्या व्यक्तिचित्रणातून मानवी स्वभावाच्या कितीतरी छटा मिरासदार उपहासाने चित्रित करतात. (काकांची गंभीर गोष्ट), स्त्री आणि पुरुष यांच्या परस्पर विसंगत स्वभावाचे दर्शनही मिरासदार दाखवतात. (एक सदाशिवराव आणि त्यांची बायको), तर शिक्षकांची व वडिलधाऱ्यांची अहंमन्य प्रवृत्ती, मुलांना काय कळतय अशी भावना, आपण सर्व विषयात तज्ञ आहोत असे भासवणे यावरही मिरासदार नेमके बोट ठेवतात आणि उपरोधाने विनोद निर्मिती घडते. (ड्राईंग मास्तरांचा तास, खेड्यातील एक दिवस), बेरकी, धूर्त स्वभावाच्या व्यक्तिचित्रणातूनही मिरासदार विनोदनिर्मिती करतात (निकाल).

मिरासदारांच्या विनोदाचे खास वैशिष्टय म्हणजे व्यक्तिविशेष आणि प्रसंग विशेष यामधील हास्यबीजे ओळखण्याची मिरासदारांची शक्ती हे होय. चेहऱ्यावरचे उसने गांभीर्य ढळू न देता आपल्या व्यक्तिप्रसंगातून जन्मलेल्या एखाद्या हास्योत्पादक घटना परिस्थितीचे मिस्कील निवेदन रंगविण्याची अपूर्व शक्ती त्यांच्या ठिकाणी आहे. असे असले तरी प्रसंगनिष्ठ, व्यक्तिनिष्ठ उपहास-उपरोधातून, अतिशयोक्तीतून आलेला विनोद अशी विभागणी करून मिरासदारांच्या विनोदी कथांचा आस्वाद घेता येत नाही. प्रसंग, व्यक्ती आणि वातावरण यांच्या सीमा त्यांच्या कथातून इतक्या एकमेकात मिसळलेल्या असतात की विनोद कशातून निर्माण झाला हे सांगणे कठीण जाते. हा विनोद आणि त्याचे ढंगदार निवेदन यांचाही येथे एकजीव झालेला आहे.

"गणपत पाटील", "व्यंकूची शिकवणी", "माझ्या बापाची पेंड", "चुकामूक", "मदत" या कथांमधून गावरान, रांगडा विनोद मिरासदार फुलवितात आणि खुलवतातही. यामधुनच पुढली पायरी गाठली जाते ती किश्शांची. "कळस" सारखी कथा ही विनोदी कथा असण्यापेक्षाही किस्सा स्वरूपाची आहे.

"भव्याण्णवबादची एक सफर", "रानमाणूस", "भाकरी", "मुले पळविण्याचा प्रकार" या कथामधील विनोद मानवी जीवनातल्या दु:खाला स्पर्श करतो. "कोणे एके काळी" या कथेची प्रकृती विनोदाची नसली तरी सोमशर्माने केलेला विनोद मानवी मनातले दु:खाचे सहज दर्शन घडवून जातो. अशा विनोदामधून मानवी जीवनाचा अस्सल गाभाच वाचकांच्या हाती लेखक देत असतो.

मिरासदारांच्या कथेतील विनोदाचे स्वरूप हे असे आहे. त्यांच्या मिस्कील कल्पना-विलासाचे दर्शन तो घडवतो. मिरासदारांची हास्यकथा एकसारखी चालू राहावी, ती संपूच नये असे आपल्याला वाटते, त्याचे महत्वाचे कारण म्हणजे मानवी जीवनातील विसंगतीवर त्यांचा विनोद आधारलेला आहे.

BARR. B... ...KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

सारांश :

या दुसऱ्या प्रकरणांमध्ये मिरासदारांच्या "माझ्या बापाची पेंड" व "गप्पागोष्टी" या कथासंग्रहातील कथांचे आशय आणि विनोदाचे स्वरूप पाहिले. मिरासदारांच्या कथांच्या आशयसुत्रांमधून आपल्याला त्यांच्या लेखनाची अनेक वैशिष्ट्ये दिसून येतात.

मिरासदारांच्या कथेमध्ये शालेय वातावरणाशी निगडीत असणाऱ्या कथांना एक वेगळेच स्थान आहे. शाळा, मास्तर, मुले हा मिरासदारांच्या सतत कुतुहलाचा विषय बनलेला आहे. विद्यार्थी-दशेतील आणि शिक्षकी पेशातील अनेक बारकावे हेरून त्यातील खाचा-खोचा मिस्कीलपणे मांडल्या आहेत. "माझ्या बापाची पेंड", "व्यंकूची शिकवणी", "खेड्यातील एक दिवस" या कथांचे निवेदन त्यांनी लहान मुलांच्या तोंडून केल्याने त्या कथांना वेगळीच खुमारी आली आहे. हे बालनिवेदक निरागसपणे, चौकसबुध्दीने आपल्या शिक्षकांना, आई-वडिलांना प्रश्न विचारतात. पण शिक्षकांच्या ठिकाणी असणारी "मी" पणाची अहंमन्यप्रवृत्ती, "मुलांना काय समजते" अशी भावना त्यांची फिरकी घेणे, बढाईखोर स्वभाव यामुळे उलट त्यांचेच पितळ उघडे पडते. मुलांच्या जिज्ञासूपणाचे, कुतूहलाचे त्यांच्याकडून समाधान होत नाही. आणि मग जाता जाता ही लहान मुले-निवेदक मोठयांच्या मुर्खपणावर, आत्मप्रौढीवर नेमकेपणाने प्रकाश टाकतात. "वर्गातील एक पाठ" आणि "ड्राईंग मास्तरांचा तास या कथा-मधून मिरासदार शिक्षकीपेशातील अनेक चांगल्या-वाईट गोष्टीवर नेमके बोट ठेवतात. सराव पाठामधील कृत्रिमता, फाजील आत्मविश्वास, यांत्रिकतेला बळी पडलेले शिकाऊ शिक्षकी सर्व विषयात "ज्ञानी" आहोत ही आत्मप्रौढी, अहंमन्य-प्रवृत्ती, विद्यार्थ्यांना काय कळते ही समजूत आणि त्यातून विद्यार्थ्यांची फिरक्या घेण्याची प्रवृत्ती यावर मिरासदारांनी भाष्य न करता खोचक प्रकाश टाकला आहे. या कथा खुमासदार उतरण्याचे आणखी एक कारण म्हणजे मिरासदार काही काळ

शिक्षक होते. प्रत्यक्ष जीवनव्यवहारातून अनुभवातून या कथा आल्यामुळे त्यांना अधिक कलात्मकता आली आहे.

कौटुंबिक प्रसंगनिष्ठ कथेतून मिरासदार कुटुंबातील सर्व घटकांचे बारकाव्याने निरिक्षण करून कथेत वापर करतात आणि आपल्या विनोदी शैलीचा योग्य ठिकाणी वापर करून कथा रंजक बनवितात. कुटुंबातील पति-पत्निचे संबंध, भावकीतील नात्या-गोत्याचे स्वरूप, कुटुंबातील दारिद्रय, दारिद्रयामुळे होणारी कुटुंबातील घटकांची कुचंबणा, दारिद्रयावर उपाय म्हणून चोरीसारख्या प्रकाराकडे वळणे इत्यादी प्रसंग मिरासदार विनोदी शैलीने उभे करतात. "मुले पळविण्याचा प्रकार" या कथेत दत्तू चष्मेवाला आणि त्याची बायको गंगी हे समंजस जोडपे मिरासदार रंगवितात. "भावकी"सारख्या कथेतून मानवी स्वभावातील वैराचे वास्तवपूर्ण चित्रण करतात.

गंभीर प्रकृतीच्या कथांमधून, नेहमी रंजकतेकडे वळणारी मिरासदारांची शैली तटस्थतेने वर्णन करते. ही "तटस्थ वृत्ती" मिरासदार फार कौशल्याने हाताळतात. पात्रांच्या अगर प्रसंगाच्याबाबत ते कुठेही भावविवश होत नाहीत. आपला तोल कुठेही ढळू न देण्याचे फार मोठे पथ्य मिरासदारांच्या लेखणीने याकथांमधून सांभाळलेले आहे. "रानमाणूस" कथेतील बापूदेवाच्या एकुलत्या एका मुलाचा मृत्यू आणि "काकांची गंभीर गोष्ट" या कथेतील काका गंभीर या गृहस्थाचा मृत्यू या दोन्ही घटना तितक्याच गंभीरपणे, तटस्थपणाने मिरासदार वर्णन करतात. तर "कोणे एके काळी" सारख्या कथेत सोमशामाचे दु:ख तटस्थपणे पण विलक्षण सहानुभूतीने व काव्यात्मकतेने ते प्रकट करतात.

ग्रामीण प्रसंगासोबतच अस्सल गावरान व्यक्ती आणि वल्ली तितक्याच ढंगदारपणे मिरासदार आपल्या "व्यक्तिचित्रप्रधान कथां"मधून चित्रित करतात. या कथांतील काही व्यक्ती बिलंदर, धूर्त व कलंदर आहेत, तर काही निरागस, भोळयाभाबडया, समंजस आहेत. काही विक्षिप्त थापाडया आहेत तर काही

BARR. ... KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR
SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

निगरगट्ट मनाच्या आहेत. काही व्यक्ती या अबोल आहेत. विविध वृत्ती प्रवृत्तीच्या व्यक्तीआणि वल्लींनी मिरासदारांचे कथाविश्व भरुन राहिले आहे. अनेक व्यक्ती प्रत्यक्ष मिरासदारांना भेटलेल्या आहेत. त्यांचे स्वभाव, विशिष्ट लकबी, त-हेवाईक वागणे-बोलणे यांचे जवळून दर्शन घडल्याने या व्यक्ती वास्तव वाटतात.

मिरासदारांच्या "कळस", "हरवल्याचा शोध", "माझी पहिली चोरी", "मदत", "माझा कै. वृत्तपत्रव्यवसाय", "चुकामूक", "झोप" या कथांमधून प्रसंग आणि व्यक्ती यांचा एकत्र मिलाफ होऊन या कथा रंगतदार बनल्या आहेत.

एकूणच मिरासदारांच्या कथांचे आशय आणि विषय हे वैविध्यपूर्ण आहेत. मिरासदार अनेक प्रकारच्या व्यक्ती, प्रसंग,घटना, किस्से कधी वास्तव तर कधी कल्पनेच्या सहाय्याने उभा करुन आपली कथा सजग बनवितात. ग्रामीण भागातील कोर्ट कचेरीची भानगड, बाईची भानगड, भावकीचे पिढयानपिढयाचे भांडणतंटे, शाळेच्या परिसरात घडणारे गंमतीदार प्रसंग, कलंदर, धूर्त,बेरकी, अहंमन्य, समंजस, उदार, थापाडया, भोळ्या-भाबडया, निरागस व्यक्तिरेखा, ऐतिहासिक, व्यावसायिक व्यक्ति आणि प्रसंग यातून मिरासदारांची विनोदी शैली साकारते. ग्रामीण अस्सल वास्तव मिरासदार बारकाव्यासहित उभे करतात.

द.मा. मिरासदार प्रामुख्याने ग्रामीण जीवनातल्या विसंगतीवर आपले लक्ष केंद्रित करतात. ग्रामीण जीवनातील रंजक असलेले विषय मिरासदारांच्या कथेला चटकन विनोदी पातळीवरचा रंजकपणा आणून देतात. विनोदयोग्य विषय, व्यक्ती आणि प्रसंग यांच्या चित्रणाला मिरासदारांच्या मिस्कील निवेदन पध्दतीची जोड मिळाल्यामुळे तर या विनोदाची रंगत आणखीनच वाढ-ली आहे. मिरासदारांच्या काही कथातील विनोद प्रसंगनिष्ठ आहे. अर्थात ही प्रसंगनिर्मिती करीत असताना उपहास आणि उपरोधाच्या छटा या विनोदात

मिसळलेल्या आहेत. काही ठिकाणी मनुष्यस्वभावातील विसंगतीवर विनोद आधारलेला आहे. काही कथातून अतिशयोक्तीतून विनोद निर्माण झाला आहे. काही कथातून मिरासदार गावरान रांगडा विनोद फुलवितात आणि खुलवितातही. एखादा किस्सा सांगुनही मिरासदार विनोद निर्मिती करतात. तर काही कथातील विनोद मानवी जीवनातल्या दुःखाला स्पर्श करतो. अशा विनोदामधून मानवी जीवनाचा अस्सल गाभाच मिरासदार वाचकांच्या हाती देत असतात.

मिरासदारांच्या कथेतील विनोदाचे स्वरूप हे असे आहे. त्यांच्या मिस्कील कल्पनाविलासाचे दर्शन घडते. मानवी जीवनातील विसंगतीवर त्यांचा विनोद आधारलेला आहे.

या प्रकरणामध्ये मिरासदारांच्या कथांतील आशय व विनोदाचे स्वरूप आपण पाहिले. या पुढील तिसऱ्या प्रकरणांमध्ये मिरासदारांच्या कथेमधून दिसणाऱ्या व्यक्तिचित्रांचा अभ्यास आपण करणार आहोत. आशयसुत्राच्या जोडीला त्यांच्या व्यक्तिचित्रांचा अभ्यास केल्याशिवाय मिरासदारांच्या कथांचे मूल्य लक्षात येणार नाही. त्यांच्या लेखनवैशिष्ट्यांचा शोध पूर्ण होणार नाही. म्हणूनच या नंतरच्या तिसऱ्या प्रकरणांत आपण मिरासदारांच्या कथेतील ठळक व्यक्तिचित्रांची वैशिष्टये पाहणार आहोत.

.....

## प्रकरण दोन

## सं द र्भ ग्रं थ


१) मिरासदार द.मा. : "मिरासदारी", कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तिसरी आवृत्ती, १९८०, पृ. १५, १६.

२) मिरासदार द.मा. : "माझ्या बापाची पेंड", सुपर्ण प्रकाशन, पुणे, तुतीयावृत्ती पुनर्मुद्रण, १९९०, पृ. ५.

३) उपरोक्त 2 : पृ. १३२.

४) मिरासदार द.मा. : "गप्पागोष्टी", कुलकर्णी ग्रंथालय, पुणे, प्रथमावृत्ती, १९६३, पृ. ३१.

५) उपरोक्त ४ : पृ. ५८.

६) उपरोक्त ४ : पृ. १९.

७) उपरोक्त २ : पृ. १८.

८) उपरोक्त ४ : पृ. १२९-३०.

९) उपरोक्त १ : पृ. २०.

१०) उपरोक्त २ : पृ. १११.

११) उपरोक्त ४ : वृ. ५४.

१२) उपरोक्त २ : पृ. ९६-९७.

१३) उपरोक्त [१] : पृ. ३५२.

१४) उपरोक्त [२] : पृ. ७५ .

१५) उपरोक्त [२] : पृ. ४६.

१६) उपरोक्त [४] : पृ. ९४.

१७) उपरोक्त [४] : पृ. १०९.

१८) उपरोक्त [४] : पृ. १२३.

१९) उपरोक्त [२] : पृ. ५२.

२०) उपरोक्त [२] : पृ. १५६.

२१) उपरोक्त [२] : पृ. १०८.

२२) उपरोक्त [४] : पृ. ३५५.

२३) उपरोक्त [४] : पृ. ८०.

२४) उपरोक्त [४] : पृ. १३–१४.

२५) उपरोक्त [४] : पृ. ८७,

२६) उपरोक्त [२] : पृ. १२०–२१.

......